




# प्रीतिसंगम

www.pritisangam.com

सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर






| वर्ष ३० वे | अंक १७ | पाने ६ | किंमत २ रूपये | सोमवार १८ मे २०२६ | R.N.I.No.MAHMAR./2001/10338 | पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 | फोन-२२७७२५


# ३० जूनपूर्वी शेतकऱ्यांची कर्जमाफी

**पुणे/प्रतिनिधी:-**

राज्यातील शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची घोषणा करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ३० जूनपूर्वी कर्जमाफी जाहीर करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले. राज्य सरकारची कर्जमाफी प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून कॅबिनेट उपसमितीची बैठकही पार पडली आहे. काही जिल्ह्यांकडून अतिरिक्त तांत्रिक माहिती मागविण्यात आली असून ती प्राप्त होताच प्रक्रिया पूर्ण करून कर्जमाफीची घोषणा



करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

पुण्यात आयोजित 'पुणे ग्रो हॅकॅथॉन २०२६'च्या समारोप कार्यक्रमानंतर पत्रकारांशी संवाद साधताना मुख्यमंत्री बोलत होते. राज्यात वीजटंचाई नसल्याचा दावा करत त्यांनी सांगितले की, महाराष्ट्रात आवश्यकतेपेक्षा अधिक वीज उपलब्ध आहे. काही भागात तांत्रिक बिघाडांमुळे तात्पुरत्या अडचणी निर्माण होत असल्या तरी राज्यात ऊर्जा संकटाची परिस्थिती नाही.

ड्रग्जविरोधी मोहिमेबाबत बोलताना फडणवीस म्हणाले की, अमली पदार्थांचे संकट हे संपूर्ण देशासमोरील मोठे आव्हान आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली देशभर मोहिम राबवली जात असून महाराष्ट्र या कारवाईत अग्रस्थानी आहे. महाराष्ट्राची तुलना 'उडता पंजाब'शी करणे चुकीचे असून राज्याची प्रतिमा खराब करण्याचा प्रयत्न योग्य नसल्याचेही त्यांनी नमूद केले. दरम्यान पार्थ पवार यांनी घेतलेल्या भेटीबाबत विचारले असता मुख्यमंत्री म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेसचा अजित पवार गट हा महायुतीतील मित्र पक्ष आहे. त्यामुळे पार्थ पवार यांनी भेट घेणे ही मोठी राजकीय घटना नसून विविध प्रशासकीय आणि राजकीय विषयांवर चर्चा झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## मराठा समाजासाठी सरकार कटिबद्ध

मराठा आरक्षण आणि विविध मागण्यांसाठी मनोज जरांगे यांनी पुन्हा उपोषणाचा इशारा दिल्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री म्हणाले की, मराठा समाजासाठी राज्य सरकारने मोठ्या प्रमाणात योजना राबवल्या आहेत. शिक्षण, शिष्यवृत्ती, वसतिगृह, निर्वाह भत्ता आणि उद्योजकता विकासासाठी अनेक उपक्रम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून हजारो तरुण उद्योजक घडले असल्याचे नमूद करत त्यांनी स्पष्ट केले की, कोणतीही योजना बंद करण्यात आलेली नाही. जात वैधता प्रमाणपत्र प्रक्रियाही सर्वोच्च न्यायालयाच्या नियमांनुसार सुरू असून सरकार मराठा समाजाच्या प्रश्नांवर संवेदनशीलपणे काम करत असल्याचे त्यांनी सांगितले.

# कराडचा पारा चाळीस अंशावर स्थिर

## दुपारी रस्ते ओस पडले; शीतपेय, टोप्या व सनकोटला वाढली मागणी, उष्माघाताचा धोका वाढला

**कराड/प्रतिनिधी:-**

शहरासह परिसरात उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस तीव्र होत असून रविवारी कराडचे कमाल तापमान तब्बल ४० अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले. वाढत्या उष्णतेमुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले असून दुपारच्या वेळेत बाजारपेठा, चौक आणि प्रमुख रस्त्यांवर शुकशुकाट पाहायला मिळत आहे. उकाड्यामुळे नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत.

गत आठवडाभरापासून तापमानात सातत्याने वाढ होत आहे. सकाळी नऊ वाजल्यापासूनच उन्हाच्या झळा जाणवू लागतात, तर दुपारच्या वेळेत उष्णतेची तीव्रता अधिकच वाढते. परिणामी नागरिकांनी दुपारच्या वेळेत घराबाहेर पडणे कमी केले असून अनेकजण सूर्यास्तानंतरच खरेदीसाठी बाहेर पडत आहेत.

यंदा उन्हाळ्याची तीव्रता नेहमीपेक्षा लवकर जाणवू लागल्याचे चित्र आहे. उष्णतेपासून बचाव करण्यासाठी गॉगल्स, टोप्या, महिलांसाठी सनकोट, छत्र्या तसेच शीतपेये आणि थंड पदार्थांना मोठी मागणी वाढली आहे. नारळपाणी, ताक, लिंबूपाणी आणि फळांच्या रसांच्या स्टॉलवर नागरिकांची गर्दी दिसून येत आहे.

उन्हाच्या वाढत्या तीव्रतेचा परिणाम ग्रामीण भागातील शेतीकामांवरही होत आहे. दुपारच्या वेळेत शेतकरी शेतीची कामे थांबवत असून अनेकजण झाडांच्या सावलीत विसावा घेताना दिसत आहेत. घरातही उकाडा असह्य होत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत.



दरम्यान, वैद्यकीय तज्ज्ञांनी उष्माघाताचा धोका लक्षात घेता नागरिकांना विशेष काळजी घेण्याचा सल्ला दिला आहे. दिवसभरात पुरेसे पाणी पिणे, ताक, नारळपाणी, लिंबूपाणी यांसारख्या द्रव पदार्थांचे सेवन करणे, उन्हात बाहेर पडताना छत्री किंवा डोक्यावर संरक्षण वापरणे, तसेच मसालेदार व तेलकट पदार्थ टाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

उष्माघातामुळे शरीराचे तापमान अचानक वाढून गंभीर परिणाम होऊ शकतात. वेळेत उपचार न मिळाल्यास मेंदूवर परिणाम होण्याचीही शक्यता असते. त्यामुळे नागरिकांनी दुपारच्या कडक उन्हात अनावश्यक फिरणे टाळून योग्य ती खबरदारी घेणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले.

# पेट्रोल १३० रुपयांवर जाईल

**सांगली/प्रतिनिधी:-**

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशवासीयांना काही महत्त्वाचे आवाहन केल्यानंतर, पेट्रोल-डिझेल आणि सोन्यासंदर्भात खरेदी कमी करण्याचं सूचवल्यानंतर दोन दिवसांतच या सर्वांचे भाव वाढले. देशात पेट्रोल आणि डिझेलमध्ये ३ रुपयांची वाढ झाली असून नागरिकांनी, विरोधकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. काँग्रेसकडून काही ठिकाणी या दरवाढीविरोधात आंदोलने केली जात आहेत. आता, देशातील या आर्थिक परिस्थितीवर महाराष्ट्राचे माजी अर्थमंत्री जयंत पाटील यांनी भाष्य केले आहे. आज ९६ रुपयाला मिळणारा डॉलर महिन्याभरात १०० रुपयांवर जाईल. तर, महिनाभरात पेट्रोल १२० ते १३० रुपयावर जाईल, अशी धोक्याची घंटाच जयंत पाटील यांनी सांगितली. जयंत पाटील यांनी यावेळी, वाशिमधील पेट्रोल पंपावर ड्रम घेऊन मारामारी सुरू असल्याचंही सांगितलं.

कोरोनाच्या वेळी एकदा लॉकडाऊन झाला होता, आता आपोआपच लॉकडाऊन होईल अशी परिस्थिती आहे, असे म्हणत जयंत पाटील यांनी भविष्यातील अडचणी आणि धोके सांगितले आहेत. ईश्वरपूरमध्ये शेतकरी नेते रघुनाथदादा पाटील यांच्या अमृत महोत्सवी



अभिष्टचिंतन सोहळ्यात जयंत पाटील बोलत होते.

देशाच्या गृहमंत्र्यांनी पंधरा दिवसापूर्वीच आपल्याकडे सहा महिने पुरेल इतका पेट्रोल डिझेलचा साठा आहे, असं सांगितलं होतं. त्याला अजून महिना झाला नाही, तोवर देशाच्या पंतप्रधानांनी खर्च कमी करण्याच्या सूचना देशवासियांना केल्या. अशाच पद्धतीची भूमिका २०१३ साली आर्थिक परिस्थिती काठावर आल्यामुळे तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी घेतली होती. त्यावेळी आत्ताच्या मुख्यमंत्र्यांनी देशाची आर्थिक परिस्थिती डबघाईला आलेली आहे, अशा पद्धतीचा ट्विट केलं होतं. मात्र, तेच मुख्यमंत्री आज पंतप्रधानांनी केलेल्या आवाहनाची थट्टा करू नका, असे ट्विट करता आहेत, असे म्हणत जयंत पाटलांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनाही लक्ष्य केलं.







# संपादकीय

## महासत्तांच्या स्पर्धेत जगाचे भवितव्य

एकविसाव्या शतकातील जागतिक राजकारणाचे केंद्र आता स्पष्टपणे दोन महासत्तांभोवती फिरताना दिसते, त्या महासत्ता आहेत, अमेरिका आणि चीन. एकीकडे आर्थिक, तांत्रिक आणि लष्करी महासत्ता म्हणून अमेरिकेचे वर्चस्व आहे ; तर दुसरीकडे वेगाने उभारी घेत असलेला चीन आहे. या दोन शक्तींमधील संबंधांवर आज जगातील अर्थव्यवस्था, व्यापार, ऊर्जा, सुरक्षा आणि तंत्रज्ञानाचे भविष्य अवलंबून आहे. त्यामुळेच बीजिंगमध्ये झालेली चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भेट ही केवळ द्विपक्षीय बैठक नव्हती; ती जगाच्या भविष्याचा दिशादर्शक ठरू शकणारी घटना होती. प्रतिस्पर्धी नव्हे, भागीदार बना, असे आवाहन शी जिनपिंग यांनी ट्रम्प यांना करताना केले. हे वाक्य ऐकायला साधे असले, तरी त्यामागे बदलत्या जागतिक समीकरणांचे गंभीर वास्तव दडलेले आहे. कारण अमेरिका-चीन संघर्ष हा आता केवळ व्यापारापुरता मर्यादित राहिलेला नाही; तो तैवान, इंडो-पॅसिफिक, कृत्रिम बुद्धिमत्ता, ऊर्जा पुरवठा, डिजिटल नियंत्रण आणि लष्करी वर्चस्वाच्या पातळीवर पोहोचला आहे.

गेल्या काही वर्षांत अमेरिका आणि चीन यांच्यातील ट्रेड वॉरने संपूर्ण जगाला हादरवून सोडले. अमेरिकेने चीनवर आयात शुल्क वाढवले, तर चीननेही प्रत्युत्तरादाखल निर्बंध लादले. परिणामी जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाली, उत्पादन खर्च वाढला आणि विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थांवर मोठा परिणाम झाला. कोविडनंतर जग सावरत असतानाच रशिया-युक्रेन युद्ध, पश्चिम आशियातील संघर्ष आणि ऊर्जा संकट यामुळे जागतिक अर्थव्यवस्था आधीच अस्थिर आहे. अशा परिस्थितीत अमेरिका-चीन संघर्ष अधिक तीव्र झाला, तर त्याचे परिणाम संपूर्ण मानवजातीला भोगावे लागू शकतात. शी जिनपिंग यांनी व्यापार युद्धात कोणीही जिंकत नाही, हे सांगताना अप्रत्यक्षपणे अमेरिकेला इशारा दिला आहे. चीनला आता जगातील उत्पादन केंद्र म्हणून ओळखले जाते. अमेरिकेच्या अनेक मोठ्या कंपन्या चीनच्या बाजारपेठेवर अवलंबून आहेत. त्यामुळे संघर्षाचा फटका अमेरिकेलाही बसतो. याच कारणामुळे ट्रम्प यांच्यासोबत एनव्हिडिया, टेस्ला, ॲपल आणि बोईंगसारख्या कंपन्यांचे प्रमुख उद्योगपती चीन दौऱ्यावर उपस्थित होते. हे दृश्यच जागतिक अर्थव्यवस्थेची वस्तुस्थिती सांगणारे आहे. राजकीय संघर्ष असला, तरी आर्थिक परस्परावलंबित्व टाळणे अशक्य झाले आहे.

विशेष म्हणजे बोईंग विमान खरेदीचा संभाव्य प्रचंड करार आणि अमेरिकन गोमांस आयातीला चीनने पुन्हा दिलेली परवानगी ही केवळ व्यापाराची पावले नाहीत; ती परस्पर संवादाचे दरवाजे उघडे ठेवण्याची रणनीती आहे. जगातील दोन महासत्ता पूर्णतः तुटल्या, तर जागतिक अर्थव्यवस्थेचे संतुलन ढासळेल, याची जाणीव दोन्ही बाजूंना आहे. परंतु या सकारात्मक संकेतांमागे गंभीर तणावाचे सावटही तितकेच गडद आहे. तैवानचा मुद्दा हा अमेरिका-चीन संबंधांमधील सर्वात मोठा दारूगोळ्याचा ढिगारा (स्फोटक परिस्थिती ) ठरू शकतो. चीन तैवानला स्वतःचा भाग मानतो, तर अमेरिका अप्रत्यक्षपणे तैवानच्या संरक्षणासाठी उभी राहते. इंडो-पॅसिफिकमध्ये वाढणाऱ्या चीनच्या लष्करी हालचालींमुळे अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया आणि भारत यांच्यातील धोरणात्मक सहकार्य अधिक मजबूत होत आहे. त्यामुळे आशियातील सामरिक स्पर्धा अधिक तीव्र झाली आहे. याचवेळी इराण-अमेरिका तणावाने जगाला नव्या युद्धाच्या उंबरठ्यावर आणून ठेवले आहे. ट्रम्प यांनी इराणला दिलेल्या धमक्या आणि अमेरिकेच्या लष्करी हालचाली पाहता पश्चिम आशियात पुन्हा मोठा संघर्ष भडकण्याची शक्यता नाकारता येत नाही. जर अमेरिका आणि इराण यांच्यात युद्ध झाले, तर त्याचा थेट परिणाम तेलाच्या किमतींवर होईल. होर्मुझ सामुद्रधुनीतून जगातील मोठ्या प्रमाणावर तेल पुरवठा होतो. हा मार्ग अस्थिर झाला, तर जागतिक ऊर्जा बाजार कोलमडू शकतो.

याहूनही चिंताजनक बाब म्हणजे आता युद्धाची व्याख्या बदलत आहे. पूर्वी युद्ध म्हणजे रणगाडे, क्षेपणास्त्रे आणि सैनिक असे चित्र होते; आता डिजिटल पायाभूत सुविधा हेही युद्धाचे प्रमुख शस्त्र बनले आहे. समुद्राखालील इंटरनेट केबल्सवर नियंत्रण मिळवण्याचा किंवा त्यांना लक्ष्य करण्याचा धोका वाढत आहे. जगातील ९५ टक्क्यांहून अधिक आंतरराष्ट्रीय डेटा या अंडरसी केबल्सद्वारे वाहतो. बँकिंग व्यवहार, शेअर बाजार, ऑनलाईन पेमेंट, लष्करी संवाद आणि डिजिटल अर्थव्यवस्था यांचे अस्तित्व या केबल्सवर अवलंबून आहे. जर या केबल्सवर हल्ले झाले, तर जग काही तासांत डिजिटल अराजकतेत ढकलले जाऊ शकते. यामुळेच अमेरिका-चीन संबंध हे आता केवळ दोन देशांपुरते मर्यादित राहिलेले नाहीत; ते जागतिक व्यवस्थेच्या स्थैर्याशी जोडले गेले आहेत. या संघर्षात भारतासारख्या देशांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. भारत एका बाजूला अमेरिकेसोबत धोरणात्मक भागीदारी मजबूत करत आहे, तर दुसऱ्या बाजूला चीनसोबतचे आर्थिक संबंध पूर्णपणे तोडू शकत नाही. युएईसोबत झालेला एलपीजी आणि धोरणात्मक तेलसाठ्याचा करार हा भारताच्या ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय आहे. कारण जागतिक अस्थिरतेच्या काळात ऊर्जा पुरवठा सुरक्षित ठेवणे हे कोणत्याही राष्ट्रासाठी सर्वोच्च प्राधान्य ठरते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आखाती आणि युरोपीय देशांशी वाढती जवळीक ही बदलत्या जागतिक व्यवस्थेतील भारताची सक्रिय भूमिका दर्शवते. भारत आता केवळ प्रादेशिक शक्ती राहिलेला नाही; तो जागतिक संतुलन साधणारा महत्त्वाचा घटक बनत आहे. अमेरिका-चीन संघर्षात पूर्णपणे कोणत्याही एका बाजूला झुकण्याऐवजी भारताने रणनीतिक स्वायत्तता टिकवून ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. आजची जागतिक परिस्थिती पाहता एक गोष्ट स्पष्ट होते की, महासत्तांची स्पर्धा अपरिहार्य आहे; पण ती संघर्षात रूपांतरित झाली, तर त्याचा फटका सर्वसामान्य नागरिकांनाच बसणार आहे. पेट्रोल-डिझेल दरवाढ, महागाई, पुरवठा संकट, बेरोजगारी आणि डिजिटल अस्थिरता यांचे परिणाम थेट जनतेपर्यंत पोहोचतात. त्यामुळे जागतिक राजकारणातील प्रत्येक हालचालीकडे सामान्य माणसानेही सजगतेने पाहण्याची गरज आहे.

शी जिनपिंग यांचे भागीदार बना हे आवाहन केवळ कूटनीतिक वाक्य नाही; ते आजच्या अस्थिर जगासाठी आवश्यक असलेला संदेश आहे. महासत्तांनी संघर्षाऐवजी सहकार्याचा मार्ग स्वीकारला, तरच जग आर्थिक आणि सामरिक स्थैर्याकडे जाऊ शकते. अन्यथा व्यापार युद्ध, सायबर युद्ध, ऊर्जा संघर्ष आणि प्रादेशिक युद्धांच्या मालिकेतून मानवजातीला नव्या संकटांचा सामना करावा लागू शकतो. इतिहास सांगतो की, महासत्तांमधील अहंकार अनेकदा विनाशाचे कारण ठरला आहे. पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धाची बीजेही अशाच स्पर्धेतून रुजली होती. आजच्या जगात आण्विक शस्त्रे, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल नियंत्रणाच्या युगात युद्धाचे परिणाम अधिक भयंकर असतील. त्यामुळे अमेरिका आणि चीन यांनी केवळ स्वतःच्या हिताचा विचार न करता जागतिक जबाबदारीही स्वीकारली पाहिजे. कारण आजचा प्रश्न फक्त दोन देशांच्या संबंधांचा नाही; तो संपूर्ण जगाच्या भविष्याचा आहे.



## मा.आ.सुमनताई पाटील यांनी अक्कलकोटमध्ये पोलीस भरती झालेल्या मुलींचा केला सन्मान

**अक्कलकोट /प्रतिनिधी:-**

तासगाव विधानसभेच्या मा. आमदार सुमनताई पाटील यांनी अक्कलकोट मध्ये येऊन पोलीस भरती झालेल्या मुलींचा सन्मान केला आणि त्यांचा गुणगौरव करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

स्वामी भक्त तथा माजी नगरसेवक रामचंद्र समाणे यांच्या शिव सम्राट चौक येथील काला-नाग निवासस्थान येथे महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री व गृहमंत्री स्व.आर.आर. (अबा) पाटील यांच्या पत्नी माजी आमदार सुमनताई पाटील यांच्या हस्ते पोलीस भरती २०२६ मध्ये कु.अंबिका बनसोडे कु.भाग्यलक्ष्मी बाके, कु. प्रेरणा माने, कु. शिवानी मनगुळे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. हे सर्व मुली अक्कलकोट शहर व तालुकातील असून ,प्रतिकुल परिस्थितीवर मात करत ,कष्ट करून यश संपादन केले आहेत. यामुळे विशेष सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.तो देखील सत्कार हा पोलीस भरती प्रक्रियेत आमुलाग्र बदल केलेले स्व.आर.आर.पाटील यांच्या पत्नी माजी आमदार सुमनताई पाटील यांच्या हस्ते संपन्न झाला.हे आमचे भाग्य असल्याचे सत्काराला उत्तर देताना उभय सत्कार मूर्ती यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले.

यावेळी अंजनी तालुका तासगाव येथील सुवर्णा पाटील , कुंजलता पाटील, स्मिता थोरात, प्रियंका पवार, यांच्यासह ज्योती समाणे छाया मगदुम, कु.गायत्री समाणे महारुद्र जगनाडे बाबुराव समाणे, राजकुमार कांदे, सचिन स्वामी समर्थ महामुनी आदी जणं उपस्थिती होते.

# कोयना जलविद्युत प्रकल्पाचे ६४ वर्षांचे योगदान

**महाराष्ट्राच्या औद्योगिक, कृषी आणि सामाजिक विकासाच्या इतिहासात काही प्रकल्प हे केवळ विकासकामे राहत नाहीत, तर ते राज्याच्या प्रगतीचे प्रतीक बनतात. सातारा जिल्ह्यातील कोयना जलविद्युत प्रकल्प हा त्यापैकीच एक होय. राज्याच्या ऊर्जा क्षेत्राला क्रम आधार देणाऱ्या या प्रकल्पाला नुकतीच ६४ वर्षे पूर्ण झाली आहेत. दि. १६ मे १९६२ रोजी पोफळी येथे पहिल्या टप्प्यातून वीज निर्मिती सुरू झाली आणि तेव्हापासून कोयना प्रकल्प महाराष्ट्राच्या प्रगतीचा अखंड दीपस्तंभ ठरला आहे.**







**अशोक सुतार**

**कृष्णाकाठ...**

आज महाराष्ट्राच्या ऊर्जा सुरक्षेचा विचार केला, तर कोयना प्रकल्पाचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. कारण हा प्रकल्प केवळ वीज निर्मिती करणारा नाही, तर राज्याच्या औद्योगिक विकासाला गती देणारा, शेतीला बळ देणारा आणि ग्रामीण भागात प्रकाश पोहोचवणारा महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. महाराष्ट्राची जीवनवाहिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोयना नदीवर (ता. पाटण जि. सातारा ) उभारलेला हा प्रकल्प भारतीय अभियंत्यांच्या दूरदृष्टीचा आणि तांत्रिक कौशल्याचा अद्भुत नमुना मानला जातो. महाबळेश्वरच्या डोंगररांगांत उगम पावणाऱ्या कोयना नदीवर उभारण्यात आलेले कोयना धरण हे अभियांत्रिकी कौशल्याचे प्रतीक आहे. १०३ मीटर उंच आणि ८०७ मीटर लांबीच्या या भव्य धरणामुळे निर्माण झालेला शिवसागर जलाशय हा महाराष्ट्रातील सर्वात महत्त्वाच्या जलस्रोतांपैकी एक आहे. १९५३ मध्ये या प्रकल्पाला मंजुरी मिळाली आणि १९ जानेवारी १९५४ रोजी तत्कालीन नेते मोरारजी देसाई यांच्या हस्ते भूमिपूजन झाले. त्यानंतर सुरू झालेला विकासाचा प्रवास आजही अखंड सुरू आहे.


कोयना प्रकल्पाची एकूण स्थापित क्षमता १९६० मेगावॅट इतकी आहे. हा प्रकल्प चार टप्प्यांत विकसित करण्यात आला असून, पोफळी, अलोरे, कोळकेवाडी आणि धरण पायथा वीजगृह या माध्यमांतून वीज निर्मिती केली जाते. विशेष म्हणजे, मागणीच्या उच्च वेळेत जवळपास २९५८ मेगावॅटपर्यंत वीज निर्मिती करण्याची क्षमता या संपूर्ण प्रणालीमध्ये आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या वीज ग्रीडमध्ये कोयना प्रकल्पाला अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. या प्रकल्पाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे पश्चिम घाटातील नैसर्गिक उंचीचा केलेला प्रभावी वापर. सह्याद्रीच्या डोंगररांगांमधून पाण्याला मिळणारा प्रचंड दाब वापरून भूमिगत वीजगृहांमध्ये वीजनिर्मिती केली जाते. आजही सह्याद्री पर्वतरांगांच्या पोटात ३०० मीटर खोलीवर कार्यरत असलेली वीज केंद्रे पाहिली, तर भारतीय अभियंत्यांच्या कल्पकतेचे कौतुक वाटल्याशिवाय राहत नाही.

कोयना प्रकल्पाच्या पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यांमधून सुरुवातीला ६०० मेगावॅट वीज निर्मिती करण्यात आली. त्यावेळी महाराष्ट्रात वाढत्या औद्योगिकीकरणामुळे विजेची मागणी वेगाने वाढत होती. मुंबई, पुणे, कोल्हापूर, सांगलीसारख्या औद्योगिक शहरांना सातत्याने वीजपुरवठा करणे ही मोठी गरज बनली होती. त्या पार्श्वभूमीवर कोयना प्रकल्पाने राज्याच्या विकासाला मोठा हातभार लावला. त्यानंतर उभारण्यात आलेल्या तिसऱ्या टप्प्यात कोळकेवाडी धरणाच्या माध्यमातून अतिरिक्त जलदाबाचा वापर करून ३२० मेगावॅट वीज निर्मिती सुरू झाली. यामुळे उपलब्ध जलस्रोतांचा अधिक परिणामकारक वापर करण्याचा आदर्श निर्माण झाला. पुढे १९८० च्या दशकात वाढत्या वीज मागणीमुळे चौथा टप्पा उभारण्यात आला. हा टप्पा कोयना प्रकल्पाचा सर्वात महत्त्वाचा आणि आधुनिक भाग मानला जातो.

चौथ्या टप्प्यात लेक टॅपिंगसारखा धाडसी आणि अत्याधुनिक प्रयोग करण्यात आला. आशियातील अशा प्रकारचा हा पहिलाच प्रयोग होता. सह्याद्रीच्या डोंगररांगांच्या खोल भागात जलाशयाच्या तळाशी छिद्र पाडून पाणी थेट वीजगृहाकडे वळविण्यात आले. या माध्यमातून १००० मेगावॅट वीज निर्मितीची क्षमता निर्माण झाली. या टप्प्यामुळे उन्हाळ्यातील भारनियमनाचा प्रश्न मोठ्या प्रमाणात कमी झाला आणि महाराष्ट्राच्या ऊर्जा व्यवस्थेला स्थैर्य प्राप्त झाले. कोयना प्रकल्पाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ही

पान ५ वर

# श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ स्वामी भक्तांचे अश्रयस्थान



स्वामींचे भक्त संपूर्ण भारतभरातून अक्कलकोट येथे दर्शनासाठी येतात. काळानुरूप भक्त मंडळींच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होते आहे. १९८८ पासून आज पर्यंत स्वामी समर्थांच्या अन्नछत्र मंडळात अनेक वैशिष्ट्यपूर्ण बदल घडले आहेत. पण या सर्व भक्तमंडळींना अन्नपूर्णे सदा पूर्ण शंकर प्राण वल्लभे, ज्ञान वैराग्य सिध्यर्थं भिक्षान् देहीच पार्वती या श्लोकाची प्रचिती अन्नपूर्णेच्या रूपात देत, स्वामींच्या कृपा प्रसादाचा लाभ मिळवून दिला आणि अन्नदानाच्या या महाचळवळीचा पाया रचला तो श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ न्यासाच्यावतीने. १९८८ पासून अतिशय पुण्याचं पण तेवढंच आव्हानात्मक व अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत हे काम अक्कलकोट संस्थानच्या राजघराण्याचा वारसा लाभलेले संस्थापक अध्यक्ष सन्मा. श्री जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कार्यकारी अध्यक्ष सन्मा. श्री. अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या कुशल नेतृत्वाखाली श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या माध्यमातून अविरतपणे सुरू आहे.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ न्यासच्या या स्वामी कार्यावर टाकलेला हा एक दृष्टिक्षेप.....


वास्तविक, अक्कलकोट संस्थानच्या भोसले घराण्यावर श्री स्वामी समर्थ महाराजांची खास मर्जी होती आणि असीम कृपा होती. श्री स्वामी समर्थांच्या समकालीन त्यावेळेस श्रीमंत मालोजीराजे दुसरे हे गादीवर होते ते निस्सीम स्वामीभक्त होते. स्वामी भक्तीची परंपरा नंतरच्या काळात राजघराण्यात रुजत गेली आणि या राजघराण्याचा वारसा लाभलेले सन्मा.श्री जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराज यांचे करवी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाची स्थापना करून परगांवच्या स्वामी भक्तांसाठी अन्नदान हे सर्वश्रेष्ठ असे स्वामी कार्य श्री स्वामी समर्थांनी सुरु केले. स्वामी सेवेचा ध्यास आणि अक्कलकोट येथे येणाऱ्या भाविकांची सोय व्हावी या उद्देशाने, गुरूपौर्णिमेच्या शुभमुहूर्तावर सन १९८८ मध्ये सन्माननिय श्री. जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराज यांनी श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे प. पू. श्री. मोहन पुजारी आणि आपल्या इतर सहकाऱ्यांच्या सहयोगाने, अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत या धर्मादाय न्यासाची मुहूर्तमेढ रोवली. अन्नछत्राच्या उभारणी वेळी संस्थापक अध्यक्ष सन्मा.श्री जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराज यांनी आपल्या सहकार्यांबरोबर प्रथमतः ३ किलो तांदळाचा प्रसाद स्वामींना महानैवेद्य म्हणून दाखवला, भाविकांना महाप्रसाद दिला आणि अन्नछत्र मंडळाची खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. या धर्मादाय संस्थेचे रजिस्ट्रेशन (नोंदणी) झाल्यानंतर, सार्वजनिक धर्मादाय न्यास अस्तित्वात आले.

कै. अंबुबाई सरदेशमुख या मातोश्रींनी उदार अंतःकरणाने वटवृक्ष मंदिराच्या उत्तर महाव्दारालगत स्वतःच्या जागेत अन्नछत्र सुरू करण्यास परवानगी दिली. सुरवातीला अगदी लहान स्वरूपात हे कार्य सुरू होते. पण दिवसेंदिवस स्वामी भक्तांची वाढणारी गर्दी लक्षात घेता, या धर्मादाय न्यासाने देवस्थानच्या दक्षिण बाजूस कै. वीरभद्र कोळळे यांच्या मालकीच्या जागेची रीतसर खरेदी करून, त्या जागेवर नियोजनपूर्वक मोठे पत्राशेड उभारून सन १९९४ मध्ये अन्नछत्राचा कार्य विस्तार केला. सध्याचे अन्नछत्र हे प्रशस्त आणि वातानुकूलित आहे. अनेक स्वामी भक्तांनी या पुण्यकार्यात सढळ हस्ते देणग्या दिल्या. देणग्यांचा ओघ ही वाढला आणि आजही तो सुरु आहे. सुरवातीच्या काळात एस.टी. महामंडळाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सढळ हाताने मदत करून या कार्यास हातभार लावला. तसेच सोलापूरचे कै. बाळासाहेब शिंदे व कै. शिवाजीराव पिसे महाराज यांनी या कार्यासाठी खंबीर साथ दिली. त्याचप्रमाणे ॲड.मा. श्री. सुरेशचंद्र भोसले, पुणे आणि सन्मा. ॲड. श्री नितीनजी हबीब यांनी या स्वामी कार्यासाठी वेळोवेळी मार्गदर्शन करीत मोलाची साथ दिली आहे.

स्वामी भक्तांचे व शहरवासी यांचे श्रध्देचे स्थान असलेल्या शमी विघ्नेश गणेशाची स्थापना १९९२ साली 'यात्रीभुवन' समोर शमीच्या विशाल वृक्षाखाली करून सुंदर असे मंदिर त्या ठिकाणी उभारलेले आहे. या गणेशाची नित्योपचार व पूजा होत असून येथे श्री गणेश जयंती व श्री गणेश चतुर्थी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.

सर्व स्वामी सेवेकऱ्यांच्या सहकार्याने, अन्नछत्र मंडळाचे कार्य आजतागायत अविरतपणे सुरू आहे. आजमितीस श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात दररोज दोन्ही वेळेस १५ ते २० हजारांवर स्वामीभक्त, महाप्रसादाचा लाभ घेऊन तृप्त होतात. उत्तम नियोजन, भक्तांच्या गर्दीचे सुयोग्य व्यवस्थापन, महाप्रसादासाठी गुणवत्तापूर्ण अन्नधान्याचा व भाजीपाल्याचा वापर करण्याची दक्षता घेतली जाते तसेच सर्व गुणवत्ता मानकांची काळजीपूर्वक अंमलबजावणी ही केली जाते. तसेच वॉटर सॉफ्टनर च्या माध्यमातून भक्तांना क्षार विरहित व आर.ओ. (ठज) चे पिण्याचे पाणी दिले जाते. दररोज केल्या जाणाऱ्या महाप्रसादात पोळी, मसालेभात, शिरा किंवा गव्हाची खीर, सांजा, आमटी, बटाटा-वांगी - काकडी भाजी, पालेभाज्या, पापड तर रात्री साधाभात, पोळी, भाजी, आमटी असे प्रसादाचे स्वरूप असते. एकादशीच्या दिवशी साबुदाणा खिचडी, दही, भगर, आमटी, खजूर, केळी असे उपवासाचे पदार्थ असतात. दररोज सकाळी ठीक ११.३० वा. मंदिरात अतिथी व मान्यवर देणगीदारांच्या हस्ते स्वामींना महानैवेद्य दाखवून, अन्नछत्रात महाआरती व संकल्प पार पडतात. यानंतर सर्व स्वामी भक्तांना महाप्रसाद दिला जातो. यासाठी अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य यांची प्रमाणपत्र आयएसओ मूल्यांकन प्रमाणपत्र व भारत सरकारचे भोग प्रमाणपत्र ही मिळालेले आहे. येथे सुमारे ३०० सेवेकरी असून त्यांच्या कुटुंबाचा चरितार्थ त्यांना मिळणाऱ्या मानधनातून चालतो.

परगावच्या स्वामी भक्तांच्या निवासाच्या दृष्टीने यात्री निवास, यात्री भुवन, अतिथी, गणेश मंदिर यात्री थांबा या निवासी इमारती बांधल्या असून यामध्ये स्वामी भक्तांना सोयी सुविधा देऊ केल्या आहेत. यात्री निवास ही भव्य इमारत २००३ पासून पासून स्वामी भक्तांच्या सेवेत रुजू झालेली आहे या इमारतीमध्ये मिनी हॉल सह कॉमन ६६ खोल्या असून १४ मोठे हॉल आहेत पैकी दहा हॉलमध्ये बेडची व्यवस्था करण्यात आलेली आहे. या इमारतीमध्ये सुमारे २००० भक्त निवासाला थांबू शकतील इतकी क्षमता आहे. यात्री भुवन या इमारतीत नॉन एसी सुट आणि एसी सुट तसेच डीलक्स एसी सुटस आहेत. सदर इमारतीत सुमारे ५०० भक्त निवास करू शकतील इतकी क्षमता . आहे गणेश मंदिर यात्री थांबा या इमारतीत एकूण बारा एसी सुट असून सुमारे ५० भक्त निवास करू शकतील इतकी क्षमता आहे. अतिथी निवास ही इमारत सुद्धा एसी असून येथे सुद्धा ५० भक्त विश्रांतीस राहू शकतील इतकी क्षमता आहे त्याचप्रमाणे स्वतंत्र पलंग व्यवस्था सुरू असून याची क्षमता ६१ इतकी आहे या सर्व इमारतीत लिफ्ट यंत्रणा कार्यान्वित असून अग्निशमन यंत्रणा सुद्धा बसविलेली आहे. सद्यस्थितीत अन्नछत्र मंडळाच्या परिसरात प्रशस्त आणि भव्य असे ८ एकरातील वाहनतळ, वाहनतळ शेड तसेच २९० के.वी. क्षमतेचा सोलर प्रकल्प कार्यान्वित आहे. अन्नछत्रामध्ये संस्थापक अध्यक्ष सन्मा. श्री जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराज यांनी स्वतः पुढाकार घेऊन सागवानी व उत्तम कलाकुसर केलेला असा स्वामींचा रथ केला असून हा रथ प्रतिवर्षी श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी वेळेस ७ दिवस पहाटे वेळेस शहरातून नगर प्रदक्षिणेस निघत असतो.




भोसले घराण्याशी असलेले जुना ऋणानुबंध जपत भारतरत्न, गानसम्राज्ञी, आदरणीय लतादीदी मंगेशकर यांनी त्यांच्या वापरात असलेली दोन वाहने भेट म्हणून देऊ केलेली आहेत. न्यासाने मंडळाच्या परिसरामध्ये ती वाहने जतन करून ठेवलेली आपल्याला पाहायला मिळतात.

महाराष्ट्राची संस्कृती आणि इतिहास दर्शन घडवणारे शिव चरित्र, धातुशिल्प प्रदर्शन भक्तांना पाहण्यासाठी उभारण्यात आले आहे. भारतरत्न गानसमाज्ञी आदरणीय लतादिदी मंगेशकर यांचेही मार्गदर्शन वेळोवेळी या न्यासास लाभलेले आहे. गडकिल्ले सृष्टी ही त्यांच्याच संकल्पनेतून साकारण्यात आली आहे. अतिथी निवासाजवळ स्वामींची महती भक्तांना कळण्यासाठी श्री स्वामी समर्थ जीवन चरित्र भित्ती शिल्प साकारण्यात आले आहे.

**श्री शामराव शिवराम मोरे**
**सचिव, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट**

अतिशय निसर्गरम्य वातावरणात सुशोभित आणि हिरवळीने नटलेल्या या आवारात श्री स्वामी समर्थ वाटिका व बालोद्यान सर्वांचेच लक्ष वेधून घेतात.

न्यासाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे प्रतिवर्षी भव्य प्रमाणात आयोजित करण्यात येणारे गुरुपौर्णिमा आणि वर्धापन दिन हा महोत्सव. या १० दिवसिय धर्मसंकिर्तन आणि सांस्कृतिक कार्यक्रमात महाराष्ट्रमधील दिग्गज प्रवचन-कीर्तनकार, गायक कलाकार आपली सेवा स्वामींच्या चरणी रुजू करतात. त्याचप्रमाणे १९८८ पासून स्वामी दर्शनास, उत्सवास व कार्यक्रमाच्या निमित्य अन्नछत्रास वेळोवेळी सदिच्छा भेट देऊन व मार्गदर्शन करणाऱ्या दिग्गज मंडळी, मान्यवर व सन्मा. देणगीदार यांनी न्यासाचे कार्याबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

श्री स्वामी समर्थ महाराजांच्या भक्तीचा प्रचार आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने, प्रतिवर्षी श्री स्वामी समर्थ पालखी पादुका परिक्रमा काढण्यात येते. पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा, खानदेश, कोकण, गोवा, कर्नाटक या राज्यातील स्वामी भक्तांना या माध्यमातून स्वामींच्या दर्शनाचा लाभ अन्नछत्र मंडळाच्या वतीने देण्यात येतो. सन १९९८ पासून ही पालखी परिक्रमा अखंडितपणे सुरू आहे.अन्नदानाच्या या पवित्र कार्याबरोबरच, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ न्यासाच्यावतीने अनेक सामाजिक कार्यांना हातभार लावला गेला आहे आणि या माध्यमातून लोकाभिमुख अशा कामांना, कायमच प्राधान्य दिले जाते. त्या समाजोपयोगी कार्याचा हा आढावा... १९९३ च्या किल्लारीच्या महाविनाशकारी भुकंपाच्या वेळेस या न्यासाने सलग एक महिना दररोज ट्रक भरून अन्नवाटप केलेले आहे.

सामाजिक बांधिलकीचे भान ठेवत या न्यासाने अक्कलकोट शहर विकास कार्यासाठी मोठे योगदान दिले आहे. स्वमालकीच्या जमिनीपैकी ४ १/२ एकर जागा मुस्लीम कब्रस्तानास, ३ एकर जागा लिंगायत स्मशानभूमीसाठी आणि ११/२ एकर जागा बाह्यवळण रस्त्यास तसेच भक्तांच्या सोयीसाठी सुलभ शौचालयाकरीता मुस्लिम कब्रस्तानाजवळ स्वमालकीची जागा नगरपरिषदेस दिली आहे. ८ कि.मी. अंतरावर असलेल्या गळोरगी येथील स्वमालकीच्या विहीरीतून ५ कोटी खर्चुन अन्नछत्रासाठी कायमस्वरुपी पाणी पुरवठा योजना केली आहे, तसेच वटवृक्ष देवस्थानासपुध्दा पाणी देऊ केले आहे. २०१४ मध्ये उद्भवलेल्या तीव्र पाणीटंचाई आणि दुष्काळजन्य परिस्थितीमध्ये अन्नछत्र मंडळाच्या वतीने, गळोरगी येथील स्व-मालकीच्या विहिरीतून पाईप लाईनव्दारे पाणी आणून सलग बारा महिने दररोज १२ लाख ५० हजार लिटर पाणी अक्कलकोट नगर परिषदेस देण्यात आले.

हे न्यास भूकंपग्रस्त, जळीतग्रस्त, पूरग्रस्तांना तातडीने मदतीचा हात पुढे करते तसेच गरिब व गरजवंताना शैक्षणिक व वैद्यकीय मदत करते. ऑगस्ट २०१९ ला कोल्हापुर व सांगली तसेच डिसेंबर २०२१ ला चिपळूण येथील पुरग्रस्तांना तातडीने जीवनावश्यक वस्तू व अन्नधान्य शिधा वाटप करून, आपलं योगदान दिले आहे. सर्व सण, उत्सव व इलेक्शन ड्युटीस कार्यरत असणारे सर्व शासकीय कर्मचारी व पोलीस बांधवांच्या भोजनाची व्यवस्था सुद्धा न्यासाकडून केली जाते. पोलिओ लसीकरणाचे वेळेस शहरातील कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना भोजन व्यवस्था केली जाते. शासनाचे विविध उपक्रमास हे न्यास सर्वोतोपरी सहकार्य करते.

राज्य परिवहन मंडळाच्या बाहेर गावाहून मुक्कामी येणाऱ्या सुमारे ४० ते ४८ बसेसच्या चालक व वाहकांना सुद्धा अद्ययावत असे विश्रांती कक्ष व वाहनतळ न्यासाकडून या परिसरामध्ये उपलब्ध करून दिलेले आहे. आतापर्यंत प्रति महिन्याची पौर्णिमा व मंडळास साजरा केल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या उत्सवा प्रसंगी २०१४ पासून सुमारे २०,००० पेक्षाही जास्त रक्तदात्यांकडून रक्त संकलन केले आणि खऱ्या अर्थाने रक्तदानाची चळवळ अक्कलकोट तालुक्यात रुजविली. तसेच स्वामी भक्तांसाठी अद्ययावत वैद्यकीय सुविधांनी युक्त ॲम्बुलन्स सेवा आणि फायर ब्रिगेड ची व्यवस्था उपलब्ध आहे. दिव्यांग व वृद्ध लोकांना अन्नछत्र परीसरात ने आण करण्यासाठी इलेक्ट्रिक बग्गी व व्हीलचेअरची सोय केली आहे. हे धर्मादाय न्यास शासनाच्या विविध योजना व कार्यक्रमास नेहमी भरीव सहकार्य करीत असते. सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक व आरोग्य विषयक, पर्यावरण विषयक, क्रिडाविषयक व सांस्कृतिक उपक्रम सदैव राबवित असते. स्त्रिभृण हत्या, हुंडाबळी, महिला आरोग्य, वृक्षे लावा व जगवा, जल साक्षरता अभियान, स्वच्छता अभियान इ. कार्याच्या माध्यमातून हे न्यास सदैव अग्रेसर आहे. वृक्षारोपण आणि त्याचे संवर्धन या महत् कार्यात सोलापूर-अक्कलकोट रस्त्याच्या दुतर्फा, वडाची झाडे लावून त्याचे जतन आणि संवर्धन करण्यात आले. शहरातील चौकाचे सुशोभीकरण केले आहे. फत्तेसिंह मैदानावर बसण्यासाठी सुमारे ५० नग सिमेंट बाकडे बसविले असून वृक्षारोपण व संवर्धन करून नगरपालिकेच्या विकास कार्यात मोठे योगदान देऊ केले आहे. अक्कलकोट शहराच्या विकासामध्ये श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाने मोलाची भूमिका बजावलेली आहे. न्यासाच्या १९८८ पासून अविरत सेवेमुळे अक्कलकोट शहरातील व लगतच्या भागातील लोकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे रोजगार उपलब्ध झालेला आहे. अन्नछत्राच्या चौकात पोलीस चौकी, तहसील कार्यालय आणि ग्रामीण रुग्णालय, या ठिकाणी कायमस्वरूपी शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. कोरोना काळात सामाजिक जाणिवेतून पुणे येथील कलावंताना मे २०२१ मध्ये मदत म्हणून सुमारे ३०० अन्नधान्य किटचे वाटप केले आहे. याच दरम्यान, अक्कलकोट येथील ग्रामीण भागात तसेच सोलापूर येथील गरजवंताना १२०० अन्नधान्य किट वाटप करण्यात आले. कोविडच्या आणि लॉकडाऊन च्या काळात, अक्कलकोट शहरामध्ये दररोज सुमारे १००० गरीब लोकांना तीन महिने जेवण वाटप केले. एकूण ५२ दिवसात ५१,५०० लोकांना अन्नवाटप केले आहे. शहरात व ग्रामीण भागात सॅनिटायझर ची फवारणी वेळोवेळी केली. यात्रीनिवास या निवासी इमारतीमध्ये शासनाचे कोविड सेंटर सुरू केले. तेथील पॉझिटिव्ह रुग्णांना दररोज चहा, नाष्टा, दोन वेळचे जेवण देण्याचे कार्य केले आहे. कोव्हिड सेंटरला स्थानिक प्रशासनाच्या मागणीनुसार ५० बेड, ५० गाद्या, ५० उशा व बेडशिटस देत व्यवस्था करण्यात आली तसेच ससून हॉस्पिटल पुणे येथे व्हेंटीलेटर देऊ केले आहे.

यत्र नार्यस्तू पुज्यंते रमंते तत्र देवता, या उक्तीला सार्थ करत, स्त्री शक्ती प्रति आदर व्यक्त करण्यासाठी हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या माध्यमातून हे न्यास उल्लेखनीय कार्य करीत आहे. हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्था हे अन्नछत्र मंडळाची सहयोगी संस्था असून, ही संस्था सामाजिक बांधिलकी जपत आरोग्य शिबिरे, रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, नवरात्री मध्ये तुळजाभवानी मंदिरात हजारो महिलांसमवेत कुंकुमअर्चन, गणेशोत्सवात हजारो महिलांसमवेत गणेश अथर्वशिर्ष पठण इ. उपक्रम राबवित सखी महिलांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे. या संस्थेच्या अध्यक्षा मा.सौ. अलकाताई जनमेजयराजे भोसले ह्या असून संस्थापक सचिवा मा.सौ. अर्पिताराजे अमोलराजे भोसले ह्या आहेत.न्यासाचे संस्थापक अध्यक्ष सन्मा. श्री. जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराज यांच्या बहुमोल मार्गदर्शनाखाली दत्तजयंती २०२१ पासून 'समर्थ महाप्रसाद सेवा' सुरु करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत, अक्कलकोट शहरातील दोन वेळच्या जेवणाची भ्रांत असलेल्या जवळपास २६० गरीब, गरजवंत व निराधार लोकांना दैनंदिन दोन वेळेचे जेवण, डब्यातून घरपोच करण्याचे कार्य, स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळामार्फत करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे हे न्यास गेली दोन वर्षापासून अक्कलकोट तालुक्यातील कुस्तीगीरांना दरमहा बदाम, काजू, आक्रोड, खारीक, साजूक तूप इ.पैलवानी खुराकाचे सुमारे ८६ कुस्तीगीरांना वाटप करीत आहे.

२०२१ मध्ये अन्नछत्रात अध्यक्षांचे कार्यालयालगत वटवृक्षाखाली असलेल्या जुन्या दत्त मंदिराची काळ्या पाषाणात उभारणी केली असून आतील सुंदर व देखणी दत्तमूर्ती जयपूरहून आणून स्थापित केली आहे. अन्नछत्राच्या पूर्वेस समर्थ वाटिकेजवळ, कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी मातेच्या काळ्या पाषाणाच्या मंदिराचे बांधकाम केले असुन प्रति तुळजाभवानी मंदिर उभारण्यात आले आहे. २०२४ पासून भक्तांना दर्शनासाठी उपलब्ध झाले आहे. ऑक्टोंबर २०२३ पासून सोलापूरच्या बी.सी. गर्ल्स हॉस्टेल मधील अनाथ १५० मुलींच्या भोजनासाठी दरमहा अन्नधान्य व खाद्यतेल पुरवठा केला जातो. जानेवारी २०२४ पासून तालुक्यातील ८६ कुस्तीगीरांना दरमहा तूप, खारीक, बदाम, अक्रोड इत्यादींचे खुराक वाटप सुरू केले आहे.

सामाजिक बांधिलकी जपत अन्नछत्र मंडळाने अक्कलकोट येथील मराठा मंदिर, मुंबई १३७ वर्षे जुने असलेल्या श्री शहाजी हायस्कूल मधील सर्व वर्ग खोल्यांचे व छताचे नुतनीकरण केले आहे. त्याचप्रमाणे जत येथील रामराव विद्यामंदिर येथे न्यासाचे वतीने ५ संगणक संच देण्यात आले आहेत. तसेच रत्नागिरी येथील मराठा मंदिर विद्यावर्धिनी यांचे अ. के. देसाई हायस्कूल व ग्लोबल इंग्लिश मिडियम स्कूलला शैक्षणिक साहित्यासाठी देणगी दिली आहे. विविध सामाजिक संस्थांना त्यांच्या लोकोपयोगी कार्यासाठी या न्यासाने आर्थिक मदत केली आहे. तसेच परगांवच्या स्वामी भक्तांच्या सोयीसाठी इलेक्ट्रिक चारचाकी वाहनांसाठी अन्नछत्राच्या वाहनतळ जागेवर टाटा पॉवर ई झेड चार्जिंग स्टेशनची सुविधा उपलब्ध आहे.





या धर्मादाय न्यासाचे वतीने अन्नछत्र मंडळालगत असलेल्या गट नं. ५८१ या मोठ्या वाहनांसाठी असलेल्या वाहनतळ जागेवर अक्कलकोट येथील क्रिकेट शिकु इच्छिणाऱ्या मुला-मुलींसाठी 'अक्कलकोट नरेश श्रीमंत विजयसिंहराजे भोसले क्रिकेट ट्रेनिंग ॲकॅडमी' चे काम पूर्ण झाले असून अल्पावधीत लोकार्पण होणार आहे. तालुक्यातील कुस्तीगीरांना कुस्तीचे चांगले प्रशिक्षण मिळावे या साठी गट नं. ५८१ या जागेवर अमोलराजे जनमेजयराजे भोसले आंतराष्ट्रीय दर्जाचे मॅट/गादी व मातीवरील कुस्ती प्रशिक्षण केंद्र (ट्रेनींग ॲकॅडमी) उभारणी अल्पावधीतच सुरु होत आहे.

मराठी भाषेस अभिजात दर्जा मिळाला असून विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी ओढा निर्माण होण्यासाठी तसेच मराठी भाषा संवर्धनासाठी या न्यासाचे वतीने भविष्यात चांगले योगदान असणार आहे. भविष्यात मराठी भाषा संवर्धनासाठी हे धर्मादाय न्यास भरीव असे कार्य करणार आहे. त्याचप्रमाणे भविष्यात हे न्यास देशी खेळास प्रोत्साहन देण्यासाठी प्रशिक्षण केंद्र उभारणार आहे. तसेच अन्नछत्र मंडळ परिसरात भाविकांसाठी ध्यानधारणागृह व योग मंदिर त्याचप्रमाणे सांस्कृतिक भवन-मंगल कार्यालय उभारणार आहे. न्यासाने जगभरातील स्वामी भक्तांच्या सोयीसाठी मंडळात चालणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती ुिराळरपपरलहरीींर.ेीस या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेली आहे. न्यासास देणगी देणाऱ्या देणगीदारास आयकरात ८० ची कलमान्वये सवलत आहे. तसेच परदेशात स्थित स्वामीभक्तांना अन्नछत्राच्या स्वामी कार्यासाठी न्यासाच्या वेबसाईटवर जाऊन ऋऊठ- ह्या अकाऊंटला देणगी देता येते.

स्वामी भक्तांचे सोयीसाठी आणि ऑनलाइन देणगी देणे सहज सुलभ व्हावे यासाठी न्यासाने क्यू आर कोड प्रणाली सुद्धा विकसित केलेली आहे. सद्या सन्मा.श्री अमोलराजे जनमेजयराजे भोसले हे या धर्मादाय न्यासाचे 'कार्यकारी अध्यक्ष' पदी असून ते सक्षमपणे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे हित आणि स्वामीभक्तांना स्वामीरुपात केंद्रस्थानी मानून कार्य करीत आहेत. त्यांनी अन्नछत्राच्या विकासास चालना दिली आहे, तसेच नियोजित महाप्रसादगृह इमारत बांधकामास गती प्राप्त करून दिली आहे.

श्री स्वामी समर्थांची आध्यात्मिक महती, त्यांचं कार्य, हे इतकं ओजस्वी आहे की, त्यांचे अनुयायी, भक्तगण यांच्या संख्येत लक्षणीय वाढ होत आहे आणि भविष्यातही ही संख्या वाढतच राहणार. ही महत्वपूर्ण बाब लक्षात घेऊन, सध्याच्या जुन्या महाप्रसाद गृहालगतच्या वाहनतळशेड, याठिकाणी भव्य नियोजित महाप्रसाद गृह साकारण्यात येणार असून नवीन तंत्रज्ञानाने परिपूर्ण असलेला, अभ्यासपूर्ण आराखडा अन्नछत्र मंडळाच्या वतीने सादर करण्यात आला आहे.

एक दृष्टिक्षेप- नव्याने बांधण्यात येणाऱ्या नियोजित महप्रसादगृहाच्या वास्तूवर..

नियोजित ५ मजली महाप्रसादगृहाची इमारत ही भव्य आणि मंदिर सदृश्य असणार आहे. ही इमारत पूर्णपणे वातानुकुलित् असून या इमारतीचे बांधकाम क्षेत्र १ लाख १९,३९८ चौरस फुट असणार आहे. इमारतीच्या टेरेसवर श्री स्वामी समर्थांची ५१ फुटांची सुंदर, रेखीव आणि भव्य मुर्ती, सर्वांचे लक्ष वेधून घेईल.

या नवीन नियोजित महप्रसादगृहात २५०० भाविकांची महाप्रसादाची व्यवस्था असून, या आराखड्याच्या माध्यमातून हे पाहू शकता की, एकूण ५ हजार भाविकांसाठी सर्व सोयी सुविधांनी युक्त अशा प्रतिक्षा कक्षाचे नियोजन करण्यात आले आहे. शिवाय या इमारतीच्या तळघरामधे धान्य- भाजीपाला कोठार, चटणी व पिठाची गिरणी तसेच १ तासामध्ये ८०० चपाती तयार करता येणाऱ्या ७ मशिन्स, आणि भांडे धुण्यासाठी डिश वॉशर यांची देखील सोय आहे. संपूर्ण इमारतीमध्ये अग्निशामन यंत्रणा बसविण्यात येणार आहे.

सदर इमारतीचे बांधकाम नोव्हेंबर २०२४ पासून सुरु झाले असुन ही सर्व अत्याधुनिक सोयी सुविधांनी सुसज्ज व प्रशस्त इमारत, स्वामी भक्तांच्या देणगीतून साकार होणार आहे.

या बांधकामाचा सर्वसाधारण अंदाजे खर्च रुपये ७२ कोटी, इतका अपेक्षित आहे. सदर इमारतीस नगरपालिकेची रीतसर बांधकाम परवानगी घेतली आहे आणि या नियोजित भव्य ५ मजली महाप्रसादगृह इमारतीचे बांधकाम सुरू आहे. सदर नियोजित भव्य अशा ५ मजली महाप्रसादगृह इमारतीचे भूमिपूजन दि.२१-७-२०२४, रोजी तत्कालीन महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व सद्याचे मुख्यमंत्री ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांचे हस्ते संपन्न झाले आहे.

श्री स्वामी समर्थांची कृपादृष्टी, स्वामी भक्तांचा स्वामींच्या रुपात मिळणारा आशीर्वाद आणि अन्नछत्रात अहोरात्र व अविरत परिश्रम करणारे, निस्वार्थी वृत्तीने सेवा करणारे असंख्य सेवेकरी व कार्यकर्ते त्यांचे परिश्रम व विनम्रता यावरच अन्नछत्राची शून्यातून निर्मिती होऊन इवल्याशा रोपट्याचे वटवृक्षात रुपांतर झाले आहे. अन्नदानाच्या धर्मकार्यास वाहून घेतलेले स्वामी रूपातील असंख्य देणगीदार आणि तरुण उत्साही व नम्र कार्यकर्ते आणि निस्वार्थीपणे सेवा करणारे सेवेकरी हेच या न्यासाच्या यशाचे गमक आहे.

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक श्री.शशिकांत आकाराम पाटील यांनी प्रीतिसंगम प्रिंटर्स, कोयना औद्योगिक वसाहत, मलकापूर-कराड येथे छापून गोदावरी प्लाझा, हेड पोस्टाजवळ, शनिवार पेठ कराड, येथे प्रसिद्ध केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. R.N.I.No.MAHMAR./२००१/१०३३८ रजिस्टर No.MAHMAR/14511/13/1/96/Te पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 ※मुख्य कार्यालय:- गोदावरी प्लाझा, हेड पोस्ट जवळ, शनिवार पेठ कराड, जि.सातारा, पिनकोड - ४१५११० फोन (०२१६४)२२७७२५,,फॅक्स २२६९२५, ※ सातारा कार्यालय:- संजीवन सीटी स्कॅन शेजारी, सिव्हील हॉस्पिटल रोड, सातारा फोन नं:-९२२६३९८८१७ RNI.mar/२००१/१०३३८.
email-pritisangamkarad@gmail.com

# सौर ऊर्जा प्रकल्प अद्यापही धूळखात

## दीड वर्ष उलटूनही प्रकल्प सुरू नसल्याने पालिका प्रशासनावर प्रश्नचिन्ह

**महाबळेश्वर/संजय चोरगे : –**

पर्यावरण संवर्धन व शाश्वत विकासाच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या माझी वसुंधरा अभियान ३.० अंतर्गत उभारण्यात आलेला सौर ऊर्जा प्रकल्प आजही धूळ खात पडल्याचा गंभीर आरोप नगरवासीयांकडून केला जात आहे. शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत महाबळेश्वर नगरपरिषदेला तब्बल दीड कोटी रुपयांचे बक्षीस प्राप्त झाले होते. मात्र या निधीचा योग्य वापर झाला का? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

'माझी वसुंधरा अभियान ३.०' हे अभियान जल, अग्नी, वायू, पृथ्वी आणि आकाश या पंचमहाभूतांवर आधारित असून पर्यावरणपूरक उपक्रमांना चालना देणे हा त्यामागील मुख्य उद्देश आहे. याच अभियानाच्या अंतर्गत महाबळेश्वर येथील ग्लेन ओगल डॅम परिसरात अग्नी या घटकाअंतर्गत सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात आला. या प्रकल्पासाठी सुमारे ६० लाख रुपये खर्च करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

पालिकेमार्फत या प्रकल्पाचा ठेका पुणे येथील 'जी, व्ही, डी, एम्पायर इंडिया' या खाजगी ठेकेदार कंपनीला देण्यात आला. मात्र कामाचे पूर्ण देयक अदा होऊन तब्बल दीड वर्ष उलटून गेले असतानाही हा प्रकल्प प्रत्यक्षात कार्यान्वित झालेला नाही. प्रकल्पाच्या ठिकाणी यंत्रणा उभारण्यात आली असली तरी ती वापराअभावी धूळ खात पडल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

यामुळे पालिका प्रशासन आणि संबंधित ठेकेदार यांच्यात नेमके कोणते हितसंबंध आहेत? असा संतप्त सवाल नगरवासीयांकडून उपस्थित केला जात आहे. शासकीय निधीतून उभारण्यात आलेल्या प्रकल्पाची अशी अवस्था होत असताना प्रशासन आणि लोकप्रतिनिधी मात्र मौन बाळगून असल्याची टीका नागरिक करत आहेत.

विशेष म्हणजे या प्रकल्पासाठी तयार करण्यात आलेल्या डीपीआर मध्ये (सविस्तर प्रकल्प अहवाल) सूर्यप्रकाशाच्या उपलब्धतेबाबत चुकीची माहिती देण्यात आल्याचा आरोपही समोर येत आहे. जून ते ऑक्टोबर या काळात महाबळेश्वर परिसरात मोठ्या प्रमाणात पाऊस आणि ढगाळ वातावरण असते. असे असतानाही या कालावधीत सर्वाधिक सूर्यकिरण उपलब्ध असल्याचा अहवाल दाखवून शासनाची दिशाभूल का करण्यात आली? असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

जर डीपीआरमध्ये खोटी अथवा दिशाभूल करणारी माहिती सादर करण्यात आली असेल, तर संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांवर चौकशीची कारवाई होणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तसेच या संपूर्ण प्रकरणात शासकीय निधीचा



अपव्यय झाला असल्याचा आरोप होत असून, याची सखोल व निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

महाबळेश्वर हे राज्यातील महत्त्वाचे पर्यटनस्थळ असून पर्यावरणाच्या दृष्टीने संवेदनशील क्षेत्र मानले जाते. अशा ठिकाणी पर्यावरणपूरक प्रकल्पच निष्क्रिय ठरत असतील तर शासनाच्या योजनांची अंमलबजावणी नेमकी कशी सुरू आहे, यावरच प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

सर्वसामान्य जनतेच्या कराच्या पैशातून उभारण्यात आलेल्या प्रकल्पाची ही अवस्था अत्यंत दुर्दैवी आहे. दोषींवर कठोर कारवाई करून निधीचा हिशोब जनतेसमोर मांडला गेला पाहिजे, अशी संतप्त प्रतिक्रिया नगरवासीय व्यक्त करत आहेत.

# सातारा पालिकेतील शिस्तभंगावर शिवेंद्रसिंहराजे यांची नाराजी

## जनतेच्या कामात अडथळे सहन न करण्याचा इशारा

**सातारा/प्रतिनिधी:–**

सातारा नगरपालिकेतील अलीकडच्या गदारोळानंतर भाजपमध्ये अंतर्गत हालचालींना वेग आला असून सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी पालिकेतील पदाधिकारी आणि नगरसेवकांची तातडीची बैठक घेत पक्षातील शिस्तभंगावर कठोर नाराजी व्यक्त केली. शहर विकासाच्या मुद्द्यांवर एकत्रितपणे काम करण्याऐवजी वैयक्तिक मतभेद आणि गटबाजी पुढे येत असल्याने त्यांनी संबंधितांना थेट शब्दांत सुनावल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

पालिकेतील सर्वसाधारण सभेत झालेल्या गोंधळामुळे शहरात भाजपच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात असताना, शिवेंद्रसिंहराजे यांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पुढाकार घेतला. जनतेने विकासासाठी निवडून दिले आहे. सभागृहात संघर्ष आणि आरोप-प्रत्यारोप करण्यासाठी नाही, असे स्पष्ट करत त्यांनी



नगरसेवकांना जबाबदारीची जाणीव करून दिली.

बैठकीत शहरातील रखडलेली विकासकामे, स्वच्छतेच्या तक्रारी, पाणीपुरवठा आणि रस्त्यांच्या कामांचा आढावा घेण्यात आला. नागरिकांना मूलभूत सुविधा देण्यात कोणतीही कुचराई चालणार नाही, असा इशाराही यावेळी देण्यात आला. विशेषतः ठेके आणि कामांच्या वाटपावरून निर्माण होणाऱ्या वादांवर शिवेंद्रसिंहराजे यांनी नाराजी व्यक्त केली. पालिकेतील कामे ही दर्जेदार आणि वेळेत पूर्ण झाली पाहिजेत. कामांच्या गुणवत्तेशी तडजोड झाली तर संबंधितांवर कारवाई होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, साताऱ्याच्या आगामी विकास आराखड्याबाबत खासदार उदयनराजे भोसले यांच्यासोबत लवकरच समन्वय बैठक होणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. शहरातील पायाभूत सुविधा, वाहतूक व्यवस्था आणि नव्या प्रकल्पांसाठी निधी उपलब्ध करून देण्यावर या बैठकीत चर्चा होणार असल्याचे सांगण्यात आले.

पालिकेतील अंतर्गत संघर्षामुळे भाजपची प्रतिमा मलिन होत असल्याची भावना बैठकीत व्यक्त करण्यात आली. त्यामुळे आगामी काळात पक्षांतर्गत शिस्त आणि समन्वय वाढवण्यावर भर दिला जाणार असल्याचे संकेत मिळत आहेत. शिवेंद्रसिंहराजेंच्या कठोर भूमिकेमुळे पालिकेतील राजकीय वातावरण पुन्हा एकदा ढवळून निघाले असून येत्या काही दिवसांत त्याचे परिणाम दिसण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# विज वितरणच्या गलथान कारभार

## कुसगावमध्ये भरवस्तीत डिपीला भिषण आग; ग्रामस्थांन मध्ये संतापाची लाट

**वाई/प्रतिनिधी:–**

वाई तालुक्याच्या पश्चिम भागात डोंगर दर्यात वसलेले अंदाजे दिड हजार लोकवस्तीचे कुसगाव हे गाव आहे या गावाच्या भरवस्तीत मध्यभागी गावाला विज पुरवठा करण्यासाठी विज वितरण कंपनीने गेल्या कित्येक वर्षां पुर्वी डिपी बसवलेली आहे याला आधार म्हणुन बसवलेले लोखंडी खांब हे सडलेले आहेत या गावात मोठे वारा वादळ आल्यास हे कुचकामी ठरलेले लोखंडी खांब डिपीसह कुठल्याही क्षणी जमीन दोस्त होवुन कधीच न भरुन येणारी मोठी दुर्घटना होऊ शकते . त्यासाठी गावात भिषण दुर्घटना होवुन माणसांचे मुडदे पडु नयेत म्हणुन ग्रामस्थांनी एकत्रीत येवुन शेकडो समस्यांच्या सह्यांचे निवेदन तयार करून



अनेकदा देवुन देखील विज वितरण कंपनीच्या कुठल्याही अधिकार्यांनी कधीच लक्ष घालून गावच्या सुरक्षेसाठी कधीच प्रयत्न न केल्याने येथील रहिवाशांन मध्ये संतापाची लाट उसळली आहे.

येथील डिपी मध्ये आज सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास अचानक शॉकसर्कीट होवुन डिपीतुन धुराचे मोठे मोठाले धुराचे लोट बाहेर येत असताना काही तरुणांनी पाहीले आणी क्षणार्धात डिपीने पेट घेतला व त्याच्यातुन आगीचे लोट बाहेर येवु लागले हे पाहताच तरुणांनसह ग्रामस्थांनी पाण्याचा मारा करुन आग विझवली पण आगीने रौद्ररूप धारण केल्याने डिपी जळुन खाक झाली. निव्वळ गलथान कारभार मुळे विज वितरण कंपनीचे हजारो रुपयांचे नुकसान झाले आहे.

इकडे सुर्य आग ओकत असल्यामुळे प्रचंड उकाडा जाणवत असतानाच घराघरातील विध्दुत पुरवठा रामभरोसे कालावधी साठी खंडीत झाल्याने ऐन उन्हाळ्यात ग्रामस्थांचे मोठे हाल होताना दिसत आहेत.या निर्माण झालेल्या गंभीर प्रश्नाकडे वाईच्या कार्यकारी अभियंता कार्यालयातील. वरिष्ठ अधिकारी लक्ष घालुन विद्युत पुरवठा सुरळीत चालू करतील का ?असा सवाल कुसगाव ग्रामस्थांनी विचारला. आहे . नवीन डिपी बसवताना भरवस्तीत बसवु नये अशी मागणी देखील ग्रामस्थांनी केली आहे .

# मान्सूनपूर्व तयारीसाठी कराड पालिकेकडून सूचना

## धोकादायक वृक्षांची छाटणी न केल्यास कारवाई; नागरिकांना सतर्कतेचे आवाहन

**कराड/प्रतिनिधी : –**

आगामी पावसाळ्यात संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी कराड नगरपालिकेने शहरातील धोकादायक वृक्ष आणि कमकुवत फांद्यांबाबत नागरिकांना सतर्कतेचे आवाहन केले आहे. मुसळधार पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्यामुळे वाळलेली अथवा अतिविस्तारित झाडे कोसळून जीवित व वित्तहानी होण्याची शक्यता लक्षात घेऊन पालिकेने विशेष मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत.

मान्सूनपूर्व तयारीचा भाग म्हणून शहरातील नागरिक, शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था, सरकारी व निमसरकारी कार्यालये तसेच विविध महामंडळांनी आपल्या परिसरातील धोकादायक झाडांचा भार कमी करावा, असे आवाहन पालिका प्रशासनाने केले आहे. खासगी जागेतील झाडांच्या धोकादायक फांद्या छाटून घेणे, रस्त्यावर झुकलेल्या फांद्यांची वेळेत देखभाल करणे तसेच वर्षभर पालवी न फुटलेली, वाळलेली किंवा कीड लागलेली झाडे हटवण्यासाठी पालिकेला माहिती देणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

जिवंत वृक्षांच्या फांद्या तोडण्यासाठी वृक्ष प्राधिकरणाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे. तसेच वृक्ष छाटणीपूर्वी दोन रंगीत छायाचित्रांसह लेखी माहिती पालिकेकडे सादर करावी लागणार आहे. नागरिकांनी जुनी, जीर्ण अथवा मोठी झाडे यांच्या खाली वाहने पार्क करणे टाळावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.मुख्याधिकारी प्रशांत व्हटकर यांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात, पावसाळ्यात वादळी वाऱ्यामुळे वृक्ष उन्मळून पडणे किंवा मोठ्या फांद्या तुटण्याच्या घटना टाळण्यासाठी ही उपाययोजना करण्यात येत असल्याचे म्हटले आहे. वृक्षाचा भार कमी करताना तो मुळापासून तोडू नये, झाडाची उंची २० फुटांपेक्षा कमी करू नये तसेच छाटणी करताना कोणतीही जीवित अथवा वित्तहानी होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

दरम्यान, विनापरवाना वृक्षतोड केल्यास 'झाडांचे संरक्षण व जतन



अधिनियम १९७५' मधील कलम २१ अन्वये संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही पालिका प्रशासनाने दिला आहे. हे आवाहन केवळ अतिधोकादायक व अतिविस्तारित वृक्षांसाठी लागू असून, नागरिकांनी अनावश्यक वृक्षतोड टाळावी, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# ऊस शेतीसाठी एआय तंत्रज्ञान प्रशिक्षणास शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**ईश्वरपूर /प्रतिनिधी:–**

आ. जयंतराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखाना, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट (व्हीएसआय) पुणे आणि कृषी विज्ञान केंद्र (केव्हीके) बारामती यांच्या संयुक्त विद्यमाने राजारामनगर (ता. वाळवा) येथील आरआयटी महाविद्यालयामध्ये ऊस शेतीसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा वापर या विषयावर आयोजित प्रशिक्षण शिबिरास ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी आ. जयंतराव पाटील यांनी व्हीएसआय आणि केव्हीकेच्या शास्त्रज्ञांशी तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांशी संवाद साधत विविध प्रश्नांची उकल केली. कार्यक्रमास राजारामबापू साखर कारखान्याचे अध्यक्ष प्रतिकदादा पाटील, उपाध्यक्ष विजयराव पाटील, कृषी विज्ञान केंद्र बारामतीचे डॉ. विवेक भोईटे, तसेच व्हीएसआयचे डॉ. समाधान सुरवसे प्रमुख उपस्थित होते. प्रारंभी लोकनेते राजारामबापू पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

प्रशिक्षण शिबिरात डॉ. विवेक भोईटे आणि डॉ. समाधान सुरवसे यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे ऊस शेती अधिक शाश्वत, अचूक आणि उत्पादनक्षम होणार असल्याचे सांगितले. शेतीमध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर वाढत असून त्यामुळे उत्पादन खर्च कमी होऊन उत्पन्न वाढण्यास मदत होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

'फसल' कंपनीचे नितीन शिंदे यांनी शेतामध्ये वापरल्या जाणाऱ्या सेन्सार तंत्रज्ञानाची माहिती देत त्याचे फायदे आणि वापर पद्धती विषद केली. तसेच 'मॅप माय क्रॉप' कंपनीचे अरुण पडोळ यांनी मोबाईल ॲपच्या माध्यमातून पीक निरीक्षण, रोगनियंत्रण आणि उत्पादन वाढीसाठी उपलब्ध सुविधांची माहिती दिली. प्रशिक्षणामध्ये डिजिटल तंत्रज्ञान, सेन्सार प्रणाली आणि मोबाईल ॲपच्या साहाय्याने पीक व्यवस्थापन अधिक परिणामकारक कसे करता येईल



याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

एआय तंत्रज्ञान समजून घेणे आणि त्याच्या वापरातील अडचणींबाबत विचारणा करण्यात आली असता निवास खोत, विकास खांडेकर, रामचंद्र सावंत, किशोर खांडेकर यांच्यासह अनेक शेतकऱ्यांनी प्रश्न उपस्थित केले. आ. जयंतराव पाटील यांनी पुढाकार घेत विविध मुद्द्यांवर चर्चा घडवून आणत शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन केले. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी विनायक पाटील, विठ्ठल पाटील, कार्तिक पाटील, प्रदीपकुमार पाटील, अतुल पाटील, शैलेश पाटील, रघुनाथ जाधव, रमेश हाके, प्रा. डॉ. योजना शिंदे पाटील, डॉ. प्रकाश पाटील, डॉ. सचिन पाटील, संभाजी पाटील, शहाजी माळी, प्र. कार्यकारी संचालक विजय मोरे, विवेक पुजारी यांच्यासह मोठ्या संख्येने ऊस उत्पादक शेतकरी उपस्थित होते. यावेळी प्रारंभी मुख्य शेती अधिकारी प्रशांत पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. शेती समितीचे अध्यक्ष अमरसिंह साळुंखे यांनी आभार मानले.

# कराडमध्ये पोलिसांची ड्रंक अँड ड्राइव्हसह ११ वाहनचालकांवर कारवाई

## नो-पार्किंग, बेशिस्त पार्किंग आणि वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या वाहनांवर दिवसभर मोहीम

**कराड/प्रतिनिधी: –**

शहरातील वाढत्या वाहतूक कोंडी, बेशिस्त पार्किंग आणि मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्या चालकांविरोधात कराड शहर वाहतूक पोलिसांनी रविवारी विशेष धडक मोहीम राबवली. या कारवाईदरम्यान वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या सहा वाहनचालकांवर तसेच ड्रंक अँड ड्राइव्ह प्रकरणी पाच जणांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. एकूण ११ वाहनचालकांवर कारवाई करून पोलिसांनी नियमभंग करणाऱ्यांना इशारा दिला.

शहरात नो-पार्किंगमध्ये वाहने उभी करणे, रस्त्यावर बेशिस्त पार्किंग करणे, जड वाहनांच्या नियमांचे उल्लंघन करणे तसेच विनापरवाना फलक लावण्याचे प्रकार वाढत असल्याने वाहतूक शाखेने कठोर भूमिका घेत ही मोहीम हाती घेतली. उपविभागीय पोलिस अधिकारी राजश्री पाटील, शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक दत्तात्रय दराडे आणि वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील विविध भागांत ही कारवाई करण्यात आली.

कृष्णा नाका, उपजिल्हा रुग्णालय परिसर, प्रीतिसंगम घाट, बसस्थानक, कोल्हापूर नाका आणि विजयदिवस चौक परिसरात पोलिसांनी नाकाबंदी करून वाहनांची तपासणी केली. दुचाकी व चारचाकी वाहनांची कागदपत्रे, वाहनचालकांचे परवाने तसेच संशयास्पद हालचालींची तपासणी करण्यात आली. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर तत्काळ दंडात्मक कारवाई करण्यात आली.

अचानक सुरू झालेल्या या मोहिमेमुळे शहरातील प्रमुख चौकांमध्ये काही काळ वाहनचालकांची धावपळ उडाल्याचे चित्र दिसून आले. वाहतूक नियमांचे पालन न करणाऱ्यांविरोधात अशी कारवाई पुढेही सुरू राहणार असल्याचा इशारा पोलिसांकडून देण्यात आला.



कडेगाव नगरपंचायत सभागृहामध्ये स्व.आमदार संपतरावजी देशमुख यांना अभिवादन करताना नगराध्यक्ष धनंजय देशमुख, ज्येष्ठ नेते चंद्रसेन देशमुख, सभापती निलेश लंगडे यांच्यासह मान्यवर.

# कडेगांव नगरपंचायतीत लोकनेते स्व.आ.संपतरावजी देशमुख यांना अभिवादन

**कडेगाव/प्रतिनिधी:–**

कडेगाव नगरपंचायतीच्या सभागृहामध्ये नगराध्यक्ष धनंजय देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत आशिया खंडातील सर्वात मोठ्या टेंभू उपसा जलसिंचन योजनेचे शिल्पकार, भिलवडी वांगी विधानसभा मतदारसंघाचे दिवंगत आमदार लोकनेते स्व. संपतरावजी देशमुख आण्णा यांना ३० व्या. स्मृती दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले, त्यांच्या पवित्र स्मृतीस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी सभापती निलेश लंगडे, ज्येष्ठ नेते चंद्रसेन देशमुख, नगरसेवक गणेश भोसले, विलास धर्मे, प्रकाश शिंदे, रवी पवार, चंद्रहास्य देशमुख, श्रीजय देशमुख, पत्रकार हिराजी देशमुख, पत्रकार शिवाजी मोहिते,ज्योतीराम देशमुख, वैभव धर्मे, सुशांत पवार, रमेश पवार, रवी सूर्यवंशी यांच्यासह ग्रामस्थांनी आदरांजली वाहिली.

# शक्तीपीठ महामार्गाच्या विरोधासाठी पालखी महामार्गावर रास्ता रोका

**सातारा/प्रतिनिधी:–**

राज्यातील १३ जिल्ह्यातून शक्तीपीठ महामार्गास तीव्र विरोध होत आहे. सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातून शक्तीपीठ महामार्ग हा पालखी महामार्ग व पुणे – सोलापूर महामार्गास समांतर असल्याने शेतकऱ्यांचा या महामार्गास विरोध असून एक इंचही जमीन न देण्याचा संकल्प राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या पुणे –सोलापूर राष्ट्रीय महामार्ग रास्ता रोकोच्या आंदोलनादरम्यान केला.

राज्यातून सर्वच भागातून शक्तिपीठ महामार्गास कडाडून विरोध होत असून रास्ता रोको, मोर्चे, उपोषणे, धरणे आंदोलन यासारखी आंदोलने करून शेतकऱ्यांनी आंदोलनाची धग कायम ठेवली आहे. आज स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली माढा तालुक्यातील अरण या गावी पुणे –सोलापूर महामार्ग रास्ता रोको करून बंद ठेवण्यात आला. माढा तालुक्यातून सर्वाधिक द्राक्ष, ऊस व डाळींब बागायती जमीनी यासाठी संपादित केल्या जाणार आहेत. शेतकऱ्यांनी उजनी डाव्या कालव्यातून १० ते १२ किलोमीटर पाईपलाईन करून जमीनी बागायती केलेल्या आहेत.

संत सावता माळी यांची संजीवन समाधी असलेल्या गावात कांदा, मुळा, भाजी अवघी विठाई माझी हा त्यांचा जगप्रसिद्ध अभंग याच अरण गावच्या मातीतील शेतामळ्यात रचला गेला. दरवर्षी आषाढी वारी झाल्यानंतर स्वतः विठ्ठलाची पालखी सावता महाराजांना भेटण्यासाठी पंढरपूरहून अरण गावी येते. याच गावातून शक्तीपीठ महामार्ग जात असल्याने व ६०० एकर जमीन यासाठी संपादित होत असल्याने संतप्त ग्रामस्थांनी या मार्गास विरोध केला आहे. सोलापूर जिल्ह्यातील गावांमधून लढा तीव्र होत असून शेतकरी संघटित झाला आहे.

दरम्यान शेतकऱ्यांनी महामार्ग रोखल्यानंतर पंधरा मिनीटांतच पोलिसांनी शेतकऱ्यांना महामार्गावरून अटकाव करण्याचा प्रयत्न केला. यावेळी राजू शेट्टी यांनी संतप्त होवून पोलिसांना चांगलेच धारेवर धरले. पोलिसांनी दडपशाही केल्यास राष्ट्रीय महामार्गावर बेमुदत बसण्याचा इशारा दिला.यानंतर पोलिसांनी सयंमाची भुमिका घेतल्याने सर्व मान्यवरांची मनोगते होवूपर्यंत जवळपास १ तास रास्ता रोको झाला.

यावेळी स्वाभिमानीचे



जिल्हाध्यक्ष विजय रणदिवे, सचिन पाटील, तानाजी बागल, शिवाजी पाटील, अजित बोरकर, सिद्धेश्वर घुगे,शाहाजन शेख, विजय शिंदे, सोमनाथ शिंदे, प्रशांत पाटील, प्रताप पिसाळ, बापूसाहेब गायकवाड, चंद्रकांत कुटे, प्रताप देशमुख , मगण काळे यांच्यासह परिसरातील शक्तीपीठ बाधित शेतकरी उपस्थित होते

# आरक्षण चळवळीमध्ये एकत्र येणे गरजेचे:सौ प्रिया नाईक

**सातारा/प्रतिनिधी:–**

कोणत्याही संघटनेत काम करायचे असेल, तर केवळ उत्साह असून चालत नाही; त्यासाठी काही मूलभूत गुण आपल्या स्वभावात असणे अत्यंत आवश्यक असते.असे मत प्रिया नाईक यांनी व्यक्त केले.

कार्यकर्त्याच्या मनात आपल्या *संघटनेबद्दल अढळ श्रद्धा आणि पूर्ण विश्वास असला पाहिजे. ज्या संघटनेत आपण काम करतो, त्या संघटनेचे ध्येय, विचार आणि उद्दिष्टे यांवर नितांत विश्वास असेल, तरच आपण दीर्घकाळ निस्वार्थ भावनेने कार्य करू शकतो.

संघटन कौशल्य हा प्रत्येक कार्यकर्त्याचा सर्वात मोठा गुण आहे. विविध स्वभावाच्या, विविध मतांच्या लोकांना एकत्र आणून सर्वांना सोबत घेऊन चालणे हीच खरी कार्यकर्त्याची ओळख असते. प्रत्येकाशी सुसंवाद ठेवणे, सर्वांचे मत ऐकणे, मतभेद असले तरी मनभेद होऊ न देणे, आणि योग्य वेळी योग्य निर्णय घेणे हीच संघटनाची ताकद असते.



संघटनेमध्ये कधी कधी काही निर्णय आपल्याला पटतीलच असे नाही. काही व्यक्तींशी विचारभिन्नता असू शकते. परंतु अशा वेळी *संयम, शिस्त आणि संघटनहिताची भावना* जपणे आवश्यक असते. मतभेद असतील तर ते योग्य व्यासपीठावर, योग्य भाषेत आणि योग्य पद्धतीने मांडले पाहिजेत. सार्वजनिक टीका किंवा मनात राग ठेवणे यामुळे संघटना कमकुवत होते.

खरा कार्यकर्ता तोच, जो *स्वतःच्या अहंकारापेक्षा संघटनेचे हित मोठे मानतो. ज्याच्या मनात पूर्वग्रह नसतो, जो सर्वांवर विश्वास ठेवतो, जो अडचणीच्या काळातही खंबीरपणे उभा राहतो आणि छोट्या छोट्या गोष्टींमुळे निराश होत नाही

आपली भूमिका नेहमी संतुलित, सकारात्मक आणि संघटनहिताची असावी. आपले प्रत्येक प्रयत्न संघटना अधिक मजबूत, व्यापक आणि प्रभावी करण्यासाठी असावेत. राग, चिडचिड, गैरसमज, पूर्वग्रह आणि अहंकार बाजूला ठेवून जर आपण निष्ठा, संयम, शिस्त आणि समर्पणाने कार्य केले, तर कोणतीही संघटना निश्चितच यशाच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचू शकते.

संघटनेवर विश्वास ठेवा सहकाऱ्यांवर विश्वास ठेवा आणि स्वतःवर विश्वास ठेवा. कारण एकजुटीतच शक्ती आहे, आणि संघटित शक्तीतच यश दडलेले आहे

# वृद्ध महिलेला लाकडी स्टिकने मारहाण

**सातारा/प्रतिनिधी:–**

सातारा तालुक्यातील लिंब गावातील चतुरबेट परिसरात कौटुंबिक वादातून एका ६५ वर्षीय महिलेला लाकडी स्टिकने मारहाण करण्यात आल्याची घटना घडली. या प्रकरणी सातारा तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, लिंब गावातील चतुरबेट येथे १५ मे रोजी दुपारी साडेएकच्या सुमारास ही घटना घडली. वत्सला हणमंत सावंत (वय ६५) यांना सोहम सुभाष सावंत (रा. लिंब) याने तू वहिनीला कुठे लपवले आहे? असा जाब विचारत संतापाच्या भरात मारहाण केली. आरोपीने हातातील लाकडी स्टिकने त्यांच्यावर हल्ला केल्याने त्या जखमी झाल्या. घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. याप्रकरणी सातारा तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियानांतर्गत विटा मंडळात समाधान शिबिर उत्साहात संपन्न

**विटा / प्रतिनिधी:–**

विटा मंडळ येथे छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान टप्पा क्र. १ अंतर्गत समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिरामध्ये महसूल विभागासह विविध शासकीय विभागामार्फत नागरिकांना विविध योजनांचे लाभ वितरित करण्यात आले. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासकीय योजनांचा लाभ घेतला.

या शिबिरास आमदार सुहास बाबर, विटा नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा काजल म्हेत्रे, उपनगराध्यक्ष अमोल बाबर, तहसिलदार योगेश्वर टोंपे, मुख्याधिकारी विक्रम पाटील, पंचायत समिती सदस्य रोशन जाधव, सरपंच, नगरसेवक तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिबिरामध्ये महसूल विभागामार्फत विविध प्रकारच्या सेवा व लाभांचे वितरण करण्यात आले. मंडळातील गावनिहाय प्राप्त अर्जांनुसार एकूण ४०२ प्रकरणांवर कार्यवाही



करण्यात आली. यामध्ये आपत नोंदी, वारस नोंदी, एकूण कमी करण्याच्या नोंदी, बुक डे बंद, १५५ दुरुस्ती, तसेच लक्ष्मी मुक्ती व पोट खराब यांसारख्या विविध महसुली कामांचा समावेश होता.

तसेच संजय गांधी योजनेअंतर्गत ९५ लाभार्थ्यांना लाभ मंजूर करण्यात आले. पुरवठा विभागामार्फत धान्य मंजुरीचे ८५ लाभार्थ्यांना लाभ वितरित करण्यात आले. स्वतंत्रसैनिकांना फरकाची सुमारे ११ लाख रुपयांची रक्कम वितरित करण्यात आली.

कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना कृषी अवजारे व ट्रॅक्टर वाटप करण्यात आले. तसेच गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात योजनेअंतर्गत लाभांचे वितरण करण्यात आले. नगरपरिषदेमार्फत बचत गटांना बीज भांडवल वाटप, प्रधानमंत्री आवास योजनेतील लाभार्थ्यांना घरांच्या चाव्या प्रदान करण्यात आल्या. तसेच स्वच्छता कर्मचाऱ्यांना झझए किटचे वाटप करण्यात आले. शिबिराच्या ठिकाणी पंचायत समिती, महिला व बालविकास विभाग, भूमी अभिलेख विभाग, रोजगार हमी योजना, बचत गट, आधार कार्ड विभाग, आरोग्य विभाग, वाहतूक विभाग आदी विविध विभागांचे स्टॉल उभारण्यात आले होते. या माध्यमातून नागरिकांना विविध शासकीय सेवांची माहिती व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

सदर शिबिराचे नियोजन व अंमलबजावणी तहसील कार्यालय, विटा यांच्या मार्फत करण्यात आली. नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत करून समाधान व्यक्त केले.

# तारळी-निवकणे पाठोपाठ कोयना धरणावर अदानीचा डोळा..

## अदानी ग्रीन एनर्जी हायड्रो पंप स्टोरेज प्रोजेक्टसाठी कोयनेची पाहाणी

**पाटण/एस.मोहिते:-**

वीजनिर्मिती साठी तारळी - निवकणे पाठोपाठ आता कोयना धरणावर अदानी ग्रीन एनर्जी हायड्रो प्रोजेक्ट चा डोळा बसला असून सध्या तारळी धरणावर अदानी प्रोजेक्टचे काम वेगाने सुरू आहे. तर निवकणे धरण परिसरात या प्रोजेक्टसाठी लागणारे क्षेत्र संपादीत करण्याच्या हालचाली अदानी कंपनी कडून वेगात आहे. या पाठोपाठ कंपनी कडून कोयना धरण परिसराचा सर्वे चालू असून कोयना धरणावर देखील अदानी ग्रीन एनर्जी हायड्रो पंप स्टोरेज प्रोजेक्ट साकारण्यात येणार असल्याची माहिती समोर येत आहे. या आधीच कोयना धरण ग्रस्तांचे प्रश्न शासन दरबारी धुळ खात पडले असताना कोयना प्रोजेक्ट अदानीच्या ताब्यात देण्याचा प्रयत्न पडद्यामागे सुरू असल्याच्या हालचाली



शासनस्तरावर चालू असल्याचे गोपनीय सुत्रांनी सांगितले.

पाटण तालुका वीज निर्मितीचे माहेरघर असताना या वीज निर्मितीत दुप्पटीने वाढ करण्याचे धोरण शासनाचे ठरले आहे. देशपातळीवर वीजेची वाढती मागणी लक्षात घेता वीज निर्मितीसाठी केवळ पाटण तालुक्यातील भौगोलिक परिस्थिती अनुकूल असल्याचे संकेत वीज निर्मिती करणाऱ्या कंपन्या आणि शासनस्तरावर असल्याचे संकेत आहेत. याचा सर्वेसर्वा अभ्यास करून शासनाने तारळी धरणावर अदानी ग्रीन एनर्जी तारळी पंप स्टोरेज हायड्रो प्रोजेक्ट बसविण्याचे काम वेगाने सुरू केले आहे. यासाठी एकूण अंदाजे खर्च ५,६७५ कोठी अपेक्षित धरला आहे. तर या प्रोजेक्टसाठी २०२४ पासून डोंगर फोडून बोगद्याचे काम सुरू केले आहे. याठिकाणी एकूण- १५०० मेगावॅट वीज निर्मिती करण्यासाठी पाच युनिट बसविण्यात येणार असून प्रत्येक युनिट पाठीमागे ३०० मेगावॅट वीज निर्मिती होणार आहे. यासाठी १५०.७४ हेक्टर क्षेत्र संपादीत केले आहे. या प्रकल्पासाठी स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनी खरेदी करताना मोठ्या प्रमाणात फसवणूक झाल्याचे आरोप होत आहेत.

कोयना - निवकणे हायड्रो प्रोजेक्ट या नावाने अदानी ग्रीन एनर्जी कंपनी कडून निवकणे धरणावर २७०० मेगावॅट वीज निर्मितीचा प्रोजेक्ट प्रस्तावित आहे. यासाठी पाटण तालुक्यातील निवकणे, म्हारवंड, मराठवाडी, भारसाखळे, जवरातवाडी परिसरातील ३६१.८२ हेक्टर क्षेत्र संपादीत व खरेदी करण्यात येत आहे. या प्रकल्पासाठी ८,६१५ कोठी रुपये खर्च अपेक्षित धरला असून या प्रकल्पाच्या प्रत्येक्ष कामाला २०३० पासून टप्प्याटप्प्याने होणार असल्याचे सांगितले जात आहे. २७०० मेगावॅट वीजनिर्मिती साठी ६ युनिट बसविले जाणार असून प्रति युनिट ४५० मेगावॅट वीजनिर्मिती होणार आहे. केंद्रशासनाने या प्रकल्पासाठी २०२३ रोजी प्राथमिक मंजुरी दिली आहे. तर २०२४ रोजी पर्यावरण विभागाची तत्वतः सुधारणा मंजुरी मिळाली आहे. मात्र १९९९ पासून निवकणे धरणाचे काम रखडले असून ते गेल्या २५ वर्षात पूर्ण झाले नाही. ६५ टक्के भुसंपादनाची रक्कम भरून देखील बाधित शेतकऱ्यांना पर्यायी जमीनी मिळालेल्या नाहीत. म्हणून अदानी ग्रीन एनर्जी हायड्रो प्रोजेक्टला स्थानिक शेतकऱ्यांचा मोठ्या प्रमाणात विरोध होत आहे.

अदानी ग्रीन एनर्जी हायड्रो निवकणे प्रोजेक्टला कोयना - निवकणे हायड्रो प्रोजेक्ट असे नाव देण्यात आले आहे. सद्या तरी यात कोयना धरणाचा समावेश दाखवला नसला तरी अंतर्गत अदानी ग्रीन एनर्जी हायड्रो प्रोजेक्टसाठी कोयना धरण परिसरातील सर्वे चालू असल्याचे सांगितले जात आहे. आदानीच्या निवकणे प्रकल्पाच्या प्रत्येक्ष कामास सन २०३० पासून सुरुवात होणार आहे. भविष्यात कोयना धरणावर उभारण्यात येणारा अदानी ग्रीन एनर्जी हायड्रो प्रकल्प तारळे आणि निवकणे प्रकल्पापेक्षा मोठी वीज निर्मिती करणारा असून किमान १० हजार मेगावॅट वीजनिर्मिती अदानी ग्रीन एनर्जी हायड्रो प्रोजेक्ट कडून कोयना धरणावर करण्याचा विचार चालू आहे. कोयना धरण वीज निर्मितीचे नवीन हब तयार करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. कोयना प्रकल्प एक एनर्जी हब बनविण्याच्या उंबरठ्यावर असला तरी प्रत्येक्ष अंमलबजावणी साठी २०३० नंतर सुरुवात होणार असल्याचे सांगितले जात आहे. या वरुन महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी कोयना धरण भविष्यात अदानी कंपनीच्या हातात जाण्याची चिन्हे आहेत.

### वीज निर्मितीचे एनर्जी हब ठरणार पाटण तालुका

कोयना वीज निर्मिती प्रकल्प पासून एकुण वीज निर्मिती २२०० मेगावॅट तर पवनचक्की प्रकल्प पासून ७३० मेगावॅट वीजनिर्मिती होत आहे. अशी एकूण- २९३० मेगावॅट वीज निर्मिती होत आहे. अदानी ग्रीन एनर्जी हायड्रो प्रोजेक्ट पंप स्टोरेज मध्ये तारळी धरण - १५०० मेगावॅट, निवकणे धरण - २७०० मेगावॅट, प्रस्तावित कोयना धरण - किमान १०,००० मेगावॅट अशी एकूण - १४,२०० मेगावॅट वीज निर्मिती प्रस्तावित आहे. यामुळे पाटण तालुका देशातील एनर्जी हब ठरणार आहे.



# 'राजारामबापू' साखराळे युनिटच्या आधुनिकीकरणाचे काम सुरु

## प्रतिक पाटील:प्रतिदिन दहा हजार पाचशे मे.टन क्षमतेने गाळप करणार

**ईश्वरपूर/प्रतिनिधी : -**

राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखान्याच्या साखराळे युनिटच्या आधुनिकी करणाचे काम गतीने सुरु असून, येत्या ३० ऑगस्ट यँत हे काम पूर्ण केले जात आहे. येत्या गळीत हंगाम २०२६-२७ मध्ये साखराळे युनिटमध्ये प्रतिदिन दहा हजार पाचशे मेट्रीक टन क्षमतेने गाळप करु, असा विश्वास राजारामबापू साखर कारखान्याचे अध्यक्ष प्रतिक पाटील यांनी व्यक्त केला.

साखरळे युनिटच्या गळीत हंगाम २०२६-२७ च्या मिल रोलर पूजनप्रसंगी ते बोलत होते. प्रारंभी प्र. कार्यकारी संचालक विजय मधुकर मोरे यांच्या हस्ते विधीवत पूजन करण्यात आले. याप्रसंगी राजारामबापू साखर कारखान्याचे संचालक बाळासाहेब पवार, प्रदिपकुमार पाटील, कार्तिक पाटील, अतुल पाटील, विठ्ठल पाटील, शैलेश पाटील, प्रताप पाटील, दादासाहेब मोरे, अमरसिंह साळुंखे, रमेश हाके, रघुनाथ जाधव, राजकुमार कांबळे, दिलीपराव देसाई, प्रा.डॉ. योजना शिंदे-पाटील, दीपक पाटील, रामराव पाटील, वैभव रकटे प्रामुख्याने उपस्थित होते.

अध्यक्ष पाटील म्हणाले, साखराळे युनिटमध्ये आपण प्रतिदिन सात हजार मेट्रीक टन उसाचे गाळप करीत होतो. मात्र यावर्षी आपण आधुनिकी करणाचे काम पूर्ण करीत असल्याने प्रतिदिन दहा हजार पाचशे मेट्रीक टनाप्रमाणे गाळप करणार आहोत. आधुनिकीकरणाची कामे गतीने पूर्ण केली जात आहेत. येत्या गळीत हंगामासाठी आपल्या चारही युनिटमध्ये पुरेशा उसाची नोंद झाली असून सक्षम ऊस तोडणी आणि वाहतूक यंत्रणा उभा केली आहे. साखराळे युनिटसाठी चारशे ट्रॅक्टर, चारशे अंगद,सहाशे बैलगाड्या आणि २० मशीन चे करार पूर्ण झाले आहेत. यावेळी त्यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आपला सर्व ऊस आपल्या साखर कारखान्यास देऊन सहकार्य करावे, असे आवाहन केले.

प्रारंभी प्र. कार्यकारी संचालक विजय मधुकर मोरे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. मुख्य शेती अधिकारी प्रशांत पाटील यांनी आभार मानले. यावेळी सचिव डी.एम. पाटील, संदीप पाटील, प्रेमनाथ कमलाकर, उमेश सुतार, धैर्यशील पाटील, जे.बी. पाटील, धनाजी लाड, संभाजी खोत, डॉ. प्रकाश म्हाळुंगकर, राजेंद्र पाटील, सुनिल जाधव, संजय गुरव, मुकेश करळे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



# रिसवडमध्ये सह्याद्रीच्या कृषीदूतांचे स्वागत

**मसूर/प्रतिनिधी : -**

कराड तालुक्यातील रिसवड येथे यशवंतनगर येथील सह्याद्री कृषी महाविद्यालयाच्या कृषीदूतांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. पुढील पाच महिन्यांच्या ग्रामीण जागरूकता आणि कृषी औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रमासाठी हे कृषीदूत रिसवडमध्ये वास्तव्यास राहून शेतकऱ्यांना आधुनिक शेतीविषयक मार्गदर्शन करणार आहेत.

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्न आणि सह्याद्री सहकारी साखर कारखाना संचालित या महाविद्यालयातील चतुर्थ वर्षाच्या विद्यार्थ्यांना ग्रामीण भागात प्रत्यक्ष कार्यानुभवासह शिक्षणाच्या महत्त्वाचा टप्पा पूर्ण करावा लागणार आहे. या अंतर्गत कृषी, सामाजिक व शैक्षणिक सुविधा उत्तम असलेल्या रिसवड गावाची निवड करण्यात आली आहे.कृषीदूतांच्या स्वागतप्रसंगी उपसरपंच सुभाष इंगवले-पाटील, ग्रामसेवक मुकेश केंगार, कराड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सतिश इंगवले, ग्रामपंचायत सदस्य, तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

या अभियानात कृषीदूत म्हणून प्रणय आलदर, प्रणव औटे, केदार जाधव, प्रशांत पाटील, विक्रांत पाटील, अजित सर्वगोड व किरण व्होनमाने हे सर्व विद्यार्थी सहभागी झाले आहेत. हे विद्यार्थी शेतकऱ्यांशी संवाद साधून कृषी विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत.

# सांगली जिल्ह्यातील ग्रामीण तरुणाचा जागतिक चित्रपटसृष्टीत ठसा

## चल हल्ला बोल चित्रपटाला राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर ४० हून अधिक पुरस्कार

**विटा / शिराज शिकलगार:-**

सांगली जिल्ह्यातील विटा तालुक्यातील आळसंद या छोट्याशा ग्रामीण खेड्यात जन्मलेल्या युवा दिग्दर्शक, लेखक, निर्माता आणि अभिनेता महेश बनसोडे यांनी आपल्या चल हल्ला बोल या चित्रपटाच्या माध्यमातून जागतिक चित्रपटसृष्टीत वेगळी ओळख निर्माण केली आहे. मर्यादित साधने, संघर्षमय जीवन आणि ग्रामीण वास्तवातून उभा राहिलेला हा प्रवास आज अनेक तरुणांसाठी प्रेरणेचा दीप ठरत आहे.

चल हल्ला बोल हा केवळ चित्रपट नाही, तर सामाजिक वेदना, अन्यायाविरोधातील आवाज आणि परिवर्तनाची हाक बनला आहे. या चित्रपटाला भारतासह अमेरिका, कॅनडा, स्पेन, ऑस्ट्रेलिया, थायलंड, नायजेरिया, इक्वेटोरियल गिनी, चीन, दुबई आदी देशांतील विविध चित्रपट महोत्सवांमध्ये निवड, नामांकन आणि पुरस्कार मिळाले आहेत. आतापर्यंत या चित्रपटाला ४० हून अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सन्मान प्राप्त झाले असून अनेक महोत्सवांमध्ये विविध अशा विशेष गौरवांनी सन्मानित



करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, जागतिक स्तरावर प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या कॅन्ससारख्या चित्रपट महोत्सवांच्या वातावरणातही चल हल्ला बोल या चित्रपटाचा विशेष शो आयोजित करण्यात आला होता. तसेच विद्रोही साहित्य संमेलनातही या चित्रपटाचे प्रदर्शन झाले होते. सामाजिक प्रश्नांवर भाष्य करणारा आणि जनतेच्या भावना व्यक्त करणारा हा चित्रपट लोकांच्या मनात इतका पोहोचला की, आज अनेक गावांमध्ये नागरिक स्वतःहून या चित्रपटाचे शो आयोजित करत आहेत. एखाद्या मोठ्या कॉर्पोरेट व्यवस्थेच्या पाठबळाशिवाय, केवळ लोकांच्या प्रेमावर आणि विचारांच्या ताकदीवर चालणारा हा प्रवास विशेष मानला जात आहे.

लोकांचा सिनेमा या संकल्पनेतून काम करणारे महेश बनसोडे हे चित्रपटाला केवळ मनोरंजन म्हणून न पाहता समाज परिवर्तनाचे माध्यम मानतात. संविधान, सामाजिक न्याय, माणुसकी आणि संघर्ष यांचा आवाज त्यांनी आपल्या चित्रपटातून जगासमोर पोहोचवला आहे.

अलीकडेच त्यांनी आणखी एका आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी चल हल्ला बोल चित्रपटाचे सबमिशन केले आहे. आळसंदसारख्या छोट्या गावातून निघालेला एक तरुण आज जगभरातील चित्रपट महोत्सवांमध्ये पोहोचत आहे, ही बाब संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानाची मानली जात आहे.

### ग्रामीण भागातील तरुणांना यशातून नवी दिशा आणि आत्मविश्वास मिळाला

महेश बनसोडे यांच्या या संघर्षमय आणि प्रेरणादायी प्रवासामुळे आता आळसंद गावाचे नावही जागतिक चित्रपटविश्वाच्या नकाशावर झळकू लागले आहे. ग्रामीण भागातील अनेक तरुणांना त्यांच्या यशातून नवी दिशा आणि आत्मविश्वास मिळत असून, मोठी स्वप्ने पाहण्यासाठी मोठ्या शहरात जन्म घ्यावा लागत नाही, हे त्यांनी आपल्या कार्यातून सिद्ध करून दाखवले आहे.

- जेष्ठ पत्रकार, शिराज शिकलगार, विटा

# भव्य कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्ह २०२६ कराडात उत्साहात

**मसूर/प्रतिनिधी : -**

लेट ड दादासाहेब चव्हाण मेमोरियल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी माळवाडी मसूर आणि शासकीय औषध निर्माण शास्त्र महाविद्यालय कराड यांच्या संयुक्त विद्यमाने, तसेच फेलिक्स जनरिक प्रा.लि. इंदौर मध्य प्रदेश यांच्या सहकार्याने येथील शासकीय औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालयात कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्ह २०२६ उत्साहात संपन्न झाला.



या प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये प्रॉडक्शन, क्वालिटी अॅटश्युरन्स , क्वालिटी कंट्रोल आणि व्हॅलिडेशन विभागातील विविध पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात आली. या उपक्रमात डी. फार्मसी, बी. फार्मसी, एम. फार्मसी, तसेच अभियांत्रिकी शाखांमधील मेकॅनिकल, सिव्हिल, इलेक्ट्रिकल, इन्स्ट्रुमेंटेशन इत्यादी विभागातील सातारा, सांगली, कोल्हापूर, उस्मानाबाद, सोलापूर, पुणे, रत्नागिरी, जळगाव, अहिल्यानगर, लातूर, जालना, नांदेड, छत्रपती संभाजीनगर, यवतमाळ, पंढरपूर, संगमेश्वर, रायगड, बीड, परभणी आदी विविध जिल्ह्यांतील सुमारे ४०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

भरती प्रक्रियेमध्ये वैयक्तिक माहिती पडताळणी, ऑप्टिट्यूड टेस्ट, तांत्रिक परीक्षा (विभागनिहाय) तसेच मुलाखत अशा विविध टप्प्यांचा समावेश होता. अंतिम निवड फेरी ही कंपनीच्या इंदौर, मध्य प्रदेश येथील प्लांटमध्ये आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

या उपक्रमासाठी प्र. प्राचार्य, डॉ. उदय देवकाते, डॉ. परेश महापराळे, डॉ. साधना शाही, डॉ. अविनाश होसमानी, डॉ. इंद्रजीत गोंजारी, डॉ. योगेश पोरे, शितल चव्हाण, डॉ. विक्रम शिंदे, डॉ. अतुल गुरव, प्रतीक जाधव, अक्षय थोरात, दर्शन भंडारी, मेघा मोहिते, अमृता नांगरे, शिल्पा कवडे यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगीता शेलार यांनी केले. तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी सहकार्य केले.

# शनि जन्मोत्सव व अमावस्येनिमित्त गौडगावच्या मारुती मंदिरात भाविकांची अलोट गर्दी

## पंचविस हजार अधिक भक्तांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

**अक्कलकोट/महेश गायकवाडः-**

श्री शनैश्वर जन्मोत्सव आणि शनि अमावस्येच्या दुर्मिळ मुहूर्तावर गौडगाव येथील श्री जागृत मारुती मंदिरामध्ये दर्शनासाठी भाविकांनी अलोट गर्दी केली होती. अनेक वर्षांनंतर आलेल्या या 'त्रिवेणी योगा'मुळे भाविकांमध्ये दर्शनासाठी मोठा उत्साह पाहायला मिळाला. अतिशय प्रसन्न आणि भक्तीमय वातावरणात भाविकांनी मारुतीरायाचे दर्शन घेतले.

या दुर्मिळ योगाचे औचित्य साधून मंदिर समितीच्या वतीने पहाटेपासूनच विविध धार्मिक कार्यक्रमांचे नेटके नियोजन करण्यात आले होते.पहाटे श्री मारुतीराया आणि शनिदेवांना जलाभिषेक व दुग्धाभिषेक करण्यात आला. यानंतर मुख्य




महारुद्राभिषेक पार पडला. तसेच नवग्रह शांती पूजा, शनि पूजा आणि गजलक्ष्मी पूजन अत्यंत श्रद्धेने करण्यात आले.

परिसराच्या व भाविकांच्या सुख-समृद्धीसाठी मंदिरात विशेष यज्ञ आणि होम-हवनही करण्यात आले. शेकडो भाविकांनी या विशेष पूजांमध्ये प्रत्यक्ष सहभाग नोंदवला,दुपारी ठीक १२ वाजता मंदिरात मारुतीरायाची व शनिदेवांची भव्य महाआरती करण्यात आली. दुपारच्या महाआरतीचा मान अक्कलकोट येथील आशोक चव्हाण यांना मिळाला. यानंतर गुलाल उधळत अत्यंत उत्साहात शनि जन्मोत्सव साजरा करण्यात आला.

दर्शनासाठी येणाऱ्या कोणत्याही भाविकाची गैरसोय होऊ नये, यासाठी 'गौडगाव मारुती अन्नछत्र मंडळा'च्या वतीने दिवसभर अखंड अन्नदान सेवा सुरू होती. दर्शनाला आलेल्या जवळपास पंचविस हजार अधिक भक्तांनी घेतला महाप्रसादाचा लाभ. हा महाप्रसाद मिथुन कलमानी आणि मित्र मंडळ (खजुर्गी) यांच्या वतीनेही शनि जन्मोत्सवाच्या निमित्ताने आयोजन करण्यात आले होते.हा संपूर्ण उत्सव शांततेत आणि शिस्तीत पार पाडण्यासाठी मंदिर समितीने चोख व्यवस्था ठेवली होती.

देवस्थान समिती अध्यक्ष श्रीकांत खानापुरे, सिद्राम वाघमोडे, ज्ञानेश्वर फुलारी बीरपा पुजारी परमेश्वर सुतार प्रकाश मेंथ भारत ननवरे प्रकाश सनकळ शांतया मठपती मल्लू म्हेत्रे श्रीमंत सवाळतोट श्रीमंत म्हेत्रे रमेश वाघे शरणाप्पा नाटेकर आमसिद्ध कोरे भीमना हडपद आदीसह उपस्थित होते.

श्री जागृत मारुती मंदिरात शनि जन्मोत्सव व अमावस्येनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडले.मिथुन कलमानी आणि मित्र मंडळ (खजुर्गी) यांच्या वतीने भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच बसवेश्वर रक्तपेढी, सोलापूर यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिरही पार पडले.दिवसभरात जवळपास २५ हजारांपेक्षा जास्त भाविक भक्तांनी दर्शनाचा आणि महाप्रसादाचा लाभ घेतला.

सिद्राम वाघमोडे (विश्वस्त, जागृत मारुती मंदिर, गौडगाव)

# सातारा जिल्ह्यातून दोन सराईत गुन्हेगार हद्दपार

**कराड/प्रतिनिधी : -**

शहरातील वाढत्या गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी कराड शहर पोलिसांनी कठोर पाऊल उचलत दोन सराईत गुन्हेगारांना एक वर्षासाठी सातारा जिल्ह्यातून हद्दपार केले आहे. वारंवार प्रतिबंधात्मक कारवाई करूनही संबंधितांकडून गुन्हेगारी कृत्ये सुरूच असल्याने ही कारवाई करण्यात आली.

शिवसागर ऊर्फ डोक्या संजय नलवडे (वय ३०) आणि बुधवार पेठ, कराड येथील ऋषीकेश अविनाश सावंत (वय २८) अशी हद्दपार करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, शिवसागर ऊर्फ डोक्या नलवडे व ऋषीकेश सावंत या दोघांवर कराड शहर पोलीस ठाण्यात विविध स्वरूपाचे गुन्हे दाखल असून, प्रशासन व न्यायालयाच्या आदेशांचे उल्लंघन करत शहरात दहशतीचे वातावरण निर्माण केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला होता.



कराड शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक डी. एम. दराडे यांच्या नेतृत्वाखाली संबंधितांविरोधात प्रस्ताव तयार करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. वैशाली कडुकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रांताधिकारी अतुल म्हेत्रे यांनी महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार दोन्ही गुन्हेगारांना एक वर्षासाठी सातारा जिल्ह्यातून हद्दपार करण्याचे आदेश दिले.

शहरातील गुन्हेगारी प्रवृत्तीवर नियंत्रण मिळवण्यासाठी कराड शहर पोलीस ठाण्याकडून अभिलेखावरील गुन्हेगारांची पडताळणी मोहीम सुरू असून, भविष्यातही अशाच प्रकारच्या कठोर कारवाया सातत्याने करण्यात येणार असल्याचा इशारा वरिष्ठ पोलीस निरीक्षक डी. एम. दराडे यांनी दिला आहे. गुन्हेगारी प्रवृत्तींना पाठीशी घालणाऱ्यांवरही कठोर कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. वैशाली कडुकर, पोलीस उप अधीक्षक राजश्री पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक डी. एम. दराडे आणि सहायक पोलीस निरीक्षक विजय गोडसे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक निखिल मगदूम यांच्यासह पोलीस कर्मचारी पाटील, कुंभार, जगताप, स्वामी, आनंदा जाधव, धीरज कोरडे, मोसीन मोमीन, मुकेश मोरे, अमोल देशमुख, निलेश विभुते आणि महिला पोलीस अंमलदार सोनाली पिसाळ यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

# माजी विद्यार्थिनीने दिले खेळासाठी व्यासपीठ बांधून

## सौ.सोनाली हनुमंत रांजणे व्यासपीठाचे मान्यवरांच्या हस्ते लोकार्पण

**पांचगणी/प्रतिनिधी:-**

दापवडी तालुका जावली येथील दत्तात्रय कळंबे महाराज विद्यालयात उन्नती परिवार आणि शाळेच्या माजी विद्यार्थिनी चे वतीने उभारलेल्या सौ. सोनाली हनुमंत रांजणे भव्य व्यासपीठाचे लोकार्पण विविध मान्यवरांचे हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कोयना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष किसन जाधव हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून उन्नती व उत्कर्ष परिवार संचालिका सोनाली रांजणे व उन्नती व उत्कर्ष परिवार संस्थापक-अध्यक्ष हनुमंत बळवंत रांजणे हे उपस्थित होते तर संस्थेचे सचिव डी के जाधव, संचालक धोंडीराम जंगम, बी व्ही शेलार, तानाजी बाबर, व्ही. आर. उफाळे, आर. आर. जंगम, अजित आपटे, दत्तात्रय कळंबे महाराज पतसंस्थेचे चेअरमन रविकांत बेलोशे, दापवडीचे सरपंच महादेव रांजणे, माजी सरपंच संतोष रांजणे, मुख्याध्यापक डी. बी. आखाडे सर,शिक्षक पालक व विद्यार्थी उपास्थित होते.



दापवडी : सोनाली रांजणे व हनुमंत रांजणे यांचा सत्कार करताना किसन जाधव शेजारी डी के जाधव व इतर

या व्यासपीठासाठी शाळेच्या माजी विद्यार्थिनी सौ सोनाली हनुमंत रांजणे यांनी स्वखर्चातून सुमारे साडेतीन लाख रुपये खर्च करून व्यासपीठ तयार करुन दिले. याबद्दल त्यांचा संपत्नीक असा मानपत्र, शाल श्रीफळ आणी सन्मानचिन्ह देऊन शाळेच्या वतीने भव्य असा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना ज्या शाळेने आपल्याला घडवले त्या शाळेच्या संस्कारावर आज समाजात मोठे झालो त्या माउलीचे पांग फेडण्यासाठी नव्हे तर आपणही काही तरी देणे लागतो या शुद्ध भावनेने आपण सढळ हाताने शाळेला मदतीचा खारीचा वाटा उचलला आहे असे भावोदगार यावेळी सौ सोनाली रांजणे यांनी काढले.

सोनाली रांजणे यांनी शाळेसाठी मदतीचा घेतलेला निर्णय योग्य व स्तुत्य असून या व्यासपीठावरून राज्य व देश पातळीवरील वक्ते घडावेत, चांगले खेळाडू बनावेत आणी उत्तमोत्तम उत्तम विद्यार्थी तयार व्हावेत हीच आमची निर्मल अपेक्षा असून शाळेसाठी आम्ही कुठेही कमी पडणार नसल्याचे यावेळी हनुमंत रांजणे यांनी आपली भावना व्यक्त केली.

दापवडी हायस्कूलला दात्यांची कमतरता नाही पण माजी विद्यार्थी म्हणून सौ सोनाली रांजणे यांनी व्यासपीठासाठी दिलेले योगदान संस्थेच्या कायम स्मरणात राहील यापुढेही त्यांनी शाळेसाठी व शाळेच्या गुणवत्ता वाढीसाठीच्या उपक्रमात आपला सहभाग नोंदवावा अशी अपेक्षा डी के जाधव यांनी व्यक्त केली.

यावेळी एम. जी. जाधव, पी. जे. कांबळे, डी. जी. नेवसे, वाय. बी. फरांदे,आर. एस. मापारी, एस. एच. जुनघरे,उपसरपंच, सौ. नंदा रांजणे , दापवडी, सदाशिव रांजणे, विलास रांजणे पाटील, तानाजी रांजणे, सुशिल गोळे,भरत रांजणे, सचिन रांजणे,संतोष शिराळे,सौ. मंदाताई रांजणे, नथुभाऊ रांजणे, पोलीस पाटील सुनिता रांजणे ,बबन शिंदे, सरपंच सौ. संगीता शिराळे तसेच संस्थेतील प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यालयातील शाळा व्यवस्थापन समिती, शाळा व्यवस्थापन व विकास समिती, माता पालक संघ, शिक्षक पालक संघ, दापवडी पंचक्रोशीतील सर्व सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, ग्रामस्थ, शिक्षणप्रेमी विद्यालयातील विद्यार्थी यांची उपस्थिती होती

प्रस्ताविक व सूत्रसंचालन नितीन घाडगे यांनीकेले तर मुख्याध्यापक आखाडे डि व्ही यांनी उपास्थितांचे आभार मानले.


सदर शुंभाक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे कृपया दुरुपयोग करु नये.

**नशिबाची परीक्षा**

सोमवार दि. १८ मे २०२६

**मिलनम डे**

उदय-अस्त | सिंगल २-४-० मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 156 846 660 | 2-9 | 126 469 900 | 25-79-48-30-96 |

**कल्याणम**

उदय-अस्त | सिंगल ५-८-९ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 140 230 780 | 5-6 | 123 150 124 | 51-26-78-93-64 |

**मुंबैम ( मेन )**

उदय-अस्त | सिंगल ८-२-४ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 125 468 800 | 8-1 | 128 146 100 | 80-31-25-64-19 |

दिवाळी बंपर चान्सू तयार आहे संपर्क क्रमांक मो.नं. ९९७५४७९८२६

**आज का अंदाज**

सोमवार दिनांक १८ मे २०२६

| कल्याण बाजार 'पत्थर फोड एकच' | मुंबई बाजार 'पत्थर फोड एकच' |
|---|---|
| २ - ३ - ६ - ९ | २ - ५ - ६ - ७ |
| १२९-३४६-१२३-१८० | ३४५-१६८-१६९-७०० |
| ५८९-६७०-२६८-३७९ | ६७९-३४८-३४९-८९० |
| २४६-५८०-३६७-२७० | ४९९-७८०-७९०-२५० |
| जोडी | जोडी |
| २१ - ३१ - ६५ - ९५ | २० - ५० - ६१ - ७१ |
| २४ - ३४ - ६४ - ९४ | २९ - ५९ - ६३ - ७३ |
| २० - ३० - ६७ - ९७ | २८ - ५८ - ६४ - ७४ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस दि. १८-१९ मे

प्रो.रामकुमार मो.नं. ९८२२४८६०३४

सोमवार दिनांक १८ मे २०२६

सर्व बाजार साठी

| | | | |
|---|---|---|---|
| १० | ४० | ७३ | ८३ |
| १२ | ४२ | ७५ | ८५ |
| १६ | ४६ | ७९ | ८९ |
| ४७० | ७६६ | ४४९ | २८८ |
| ३८० | ३४७ | १३३ | ३७८ |
| २९० | ६८० | २५० | ४६८ |

प्रो.रामकुमार मो.नं. ९८२२४८६०३४

# विटा शहरातील वाहतूकीची कोंडी सोडवा

## वाहतूक नियंत्रण शाखेकडून विटेकरांना अपेक्षा ;शहरातील अतिक्रमण, रस्त्यावर लावलेल्या फलकांचे प्रशासनासमोर आव्हान

**विटा / शिराज शिकलगार:–**

विटा शहरातील विटा नगरपालिका व विटा पोलीस ठाणे हद्दीमध्ये सध्या चाललंय तरी काय ? असे अनेक प्रश्न वाहनधारक व विटेकर नागरिकांतुन चर्चिले जात आहे. आम्ही वेळेवर कामावर घरी जाणार की नाही ? का सतत ठिकठिकाणी वाहनकोंडीमुळे आम्हाला त्रास होत असल्याची भावना वाहनधारक व विटेकर नागरिक व्यक्त करत आहेत.



विटा शहराच्या मुख्य रस्त्यासह ठिकठिकाणी वाहन कोंडीमुळे , तसेच पार्किंगची कोणतीही सुविधा उपलब्ध नसल्याने वाहतूककोंडी वाढत आहे. विटा नगरपालिका प्रशासक आणि पोलीस प्रशासन यांच्या फक्त बैठका होतात, निर्णय होतात पण कारवाई किंवा यावर मार्ग का निघत नाही ? असे अनेक प्रश्न आता विटेकर नागरीक व वाहनधारक विटा नगरपालिका प्रशासक नगराध्यक्षा, सौ काजल म्हेत्रे व उपनगराध्यक्ष अमोल बाबर सह विटा नगरपालिकेचे मुख्याधिकारी विक्रमसिंह पाटील यांना आता प्रश्न विचारत आहे. तर विटा पोलीस ठाणे वाहतूक नियंत्रण शाखा या शाखेत वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक उदय कुलकर्णी यांनी पदभार स्वीकारला आहे. पण आता पुढे काय ? असा गंभीर प्रश्न सध्या विटेकर नागरिक व वाहनधारक करीत आहेत.

कधी येणार हे अधिकारी व संबंधित लोकप्रतिनिधी क्शन मोडवर, वाहतुकीला अडथळा ठरणारी अतिक्रमणे तातडीने दूर करणे गरजेचे असल्याने यावर उपाययोजना कराव्यात, वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी मार्ग काढणे गरजेचे आहे. पोलीस प्रशासन व नगरपालिका प्रशासन यांनी तातडीने एकत्रित येऊन निर्णय करून वाहनधारक आणि विटेकर नागरिकांच्या प्रश्नाचा विचार करावा अशी मागणी विटेकर नागरिक व माता भगिनी यांच्याकडून होत आहे.

शहरात रस्त्यावर चालताना जीव मुठीत धरून चालावे लागते. मायणी रोड, कराड रोड, खानापूर रोड, गांधी चौक या मार्गावर सतत वाहतुकीसंदर्भात अनेक अडथळे निर्माण होत आहेत. वाहनांना मार्ग मिळत नाही रस्त्यावर वाहने लावल्यामुळे वाहनधारकांना कसरत करावी लागते. खरेतर प्रत्यक्ष नगराध्यक्षा, उपनगराध्यक्ष, व विटा नगरपालिका मुख्याधिकारी यांनी व सर्व नगरसेवकांनी तातडीने बैठक घेऊन विटा शहरातील वाहनधारकांना यांच्या समस्या सोडवण्यासाठी बैठक घेऊन तातडीने प्रश्न मार्गी लावणे महत्वाचे आहे. विटा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात अपघाताचे प्रमाण किरकोळ वाढ असल्याने दैनंदिन छोटे-मोठे अपघात घडत आहेत. त्यासाठी चौकामध्ये स्पीडने येणारी वाहने शिस्तपद्धतीने व कमी वेगात कशी जाता येतील यासाठी मार्ग काढावा, अशी मागणी विटेकर नागरिकातून होत आहे.

विटा शहरात आत्ताच्या काळाची गरज म्हणून वाहतूक कोडीबाबत उपाययोजनांवर चर्चा होणे गरजेचे आहे. नुकतेच पदभार स्वीकारलेले विटा वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक उदय कुलकर्णी यांनीही क्शन मोडवर येत रस्त्यावर उतरून सिंघम भूमिका घेऊन वाहतुकीस अडथळा ठरणारे रस्त्यावर वाहने लावणार्यांवर बेधडक कारवाई करणे गरजेचे आहे. विटा शहरांमध्ये मालवाहतूक गाडी येतात त्यांना वेळ देणे गरजेचे आहे, जेणेकरून मुख्य बाजारपेठेत अडचण निर्माण होणार नाही. गांधी चौकात भाजी विक्रेत्यांनी ठाण मांडून व्यवसाय सुरू केल्यामुळे गांधी चौकातून जाणे वाहनधारकांना अवघड झाले आहे. रस्त्यावरच भाजीपाला विक्री करणार्या व्यापारीवर्गामुळे गांधी चौकामध्ये सतत गर्दी दिसून येत आहे. पण यावर नगरपालिका प्रशासन आणि पोलीस



प्रशासन का कारवाई करत नाही ? असे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. विट्यातील छत्रपती शिवाजी महाराज चौक पासून काही अंतरावर समोर असलेल्या पंचमुखी मंदिरा रोडला नो एन्ट्रीचा फलक आहे परंतु त्या नो एंट्रीमधूनच सतत वाहने चुकीच्या मार्गाने जात असतात. यावर का कारवाई केली जात नाही ? असे अनेक प्रश्न विटेकर नागरिक महिला वर्ग व वाहनधारकांनी पोलीस प्रशासन व विटा नगरपालिका प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांना विचारले आहेत. त्यामुळे नगरपालिका प्रशासन आणि पोलीस प्रशासन यांनी वेळेत लक्ष घालून रस्त्यावर वाहतुक कोंडी निर्माण होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. काही व्यापारी आपला व्यवसाय चार चाकी गाड्या लावून करत आहेत, जर रस्त्यावर अशी गाडी लागली तर वाहने कुठे लावायचे असे अनेक प्रश्न विटेकर नागरिक चर्चा करताना बोलत आहेत.

विटा उपविभागीय पोलीस अधिकारी विपूल पाटील व विटा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय फडतरे सह विटा वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक उदय कुलकर्णी यांनी वाहातूक कोंडी प्रश्नी लक्ष घालणे आता गरजेचे आहे. विटा वाहतूक शाखेच्या पोलिसांनी विट्यातील गांधी चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चौंडेश्वरी चौक, कराड रोड गांधी चौक, मायणी रोड संगम मेडिकल तसेच मायणी रोड खाऊ गल्ली अशा ठिकाणी वाहतूक पोलीसांनी वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या वाहनधारकांवर कारवाई करणे गरजेचे आहे. वाहने आणायची आणि आणली तर लावायची कुठे हा सुद्धा मोठा प्रश्न विटेकर नागरिक वाहनधारकांना पडला आहे. ना पार्किंग ना पार्किंगची सुविधा अशा अनेक गोष्टी सध्या तरी दिसून येत आहे.

# 'कर्तव्य'मुळे १०१ मुलांची दुर्धर आजारावर मात

## मोफत शस्त्रक्रिया शिबीर उत्साहात ;स्व.भाऊसाहेब महाराज यांच्या जयंतीचे औचित्य

**सातारा/प्रतिनिधी:–**

सातत्याने अनेक नावीन्यपूर्ण सामाजिक उपक्रम राबवणाऱ्या कर्तव्य सोशल ग्रुपच्या माध्यमातून आणि क्रांतिसिंह नाना पाटील जिल्हा सर्वसाधारण रुग्णालय सातारा, सायन हॉस्पिटल मुंबई, छ. संभाजी महाराज शासकीय महाविद्यालय सातारा यांच्या सहकार्याने ० ते १८ वयोगटातील १०१ गरजू मुलांनी दुर्धर आजारावर मात केली आहे. कर्तव्य सोशल ग्रुपच्या माध्यमातून मोफत शस्त्रक्रिया शिबिराचा लाभ गोर- गरीब, गरजू कुटुंबातील मुलांना झाला. शिबिराचे हे सलग दुसरे वर्ष असून काळ ९७ मुलांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली तर, विशेष शस्त्रक्रियेची आवश्यकता असलेल्या ११ मुलांवर कौशल्या हॉस्पिटल ठाणे येथे मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे,



स्व. श्रीमंत छ. अभयसिंहराजे भोसले उर्फ भाऊसाहेब महाराज यांच्या ८२ व्या जयंती निमित्त ना. श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. गेल्या वर्षीच्या शिबिरात १०७ मुलांवर विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या होत्या. या वर्षी १०१ मुलांवर हर्निया, हायड्रोसिल, टंग- टाय, फायमोसिस, केलाईड आदी विविध आजारावरील शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्या. या शस्त्रक्रिया मुंबई येथील नामांकित पीडियाट्रिक सर्जन डॉ. संजय ओक, डॉ. पारस कोठारी, डॉ. आदिती दळवी, भूलतज्ज्ञ डॉ. आमिर आणि त्यांच्या बरोबर आलेले सायन हॉस्पिटल मुंबई येथील डॉ उमाळे, डॉ श्वेता काणे,डॉ रुचिता शहा, डॉ. रवीना शेट्टी, कुमुद खडपे या वैद्यकीय टीमने केल्या. त्यांना छत्रपती संभाजी महाराज वैद्यकीय महाविद्यालय आणि क्रांतिसिंह नाना पाटील जिला रुग्णालय येथील वैद्यकीय टीमने मदत केली. हे शस्त्रक्रिया शिबिर यशस्वी करण्यासाठी मेडिकल कॉलेजचे डीन डॉ. विनायक काळे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. राहुल जाधव यांनी मदत केली.

बालकांवरील मोफत शस्त्रक्रिया शिबीर यशस्वी करण्यासाठी कर्तव्य सोशल ग्रुपचे विजय देशमुख, विलास कासार, महेश यादव, राजू महाडिक, दीपक भोसले, महेंद्र गार्डे, रवी पवार, चंद्रकांत बेबले, प्रकाश घाडगे आदी सदस्य तसेच सहभागी रुग्णालयातील सर्व स्टाफ यांनी परिश्रम घेतले.

### 'कर्तव्य'मुळे गोर- गरिबांना मिळतोय आधार

सातारा जिल्ह्यातील गोर- गरीब, गरजू मुलांवर मोफत शस्त्रक्रिया केल्या जाव्यात, यातून त्यांच्या कुटुंबाचे लाखो रुपये वाचावेत आणि त्यांना दिलासा मिळावा या हेतूने ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली कर्तव्य सोशल ग्रुपने हा अनोखा उपक्रम हाती घेतला आहे. या शिबिराचे सलग दुसरे वर्ष असून शिबिरामुळे व्याधीग्रस्त मुलांना निरोगी जीवन जगण्याची नवी दिशा मिळत आहे. व्याधिग्रस्त मुलांवर मोफत शस्त्रक्रिया होत असल्याने कर्तव्य ग्रुपमुळे गोर- गरीब, गरजू कुटुंबाना खऱ्या अर्थाने आधार मिळत आहे.

# कोयना जलविद्युत प्रकल्पाचे ६४ वर्षांचे योगदान

पान २ वरुन वीज निर्मिती पूर्णतः प्रदूषणमुक्त आहे. कोळसा किंवा इंधनावर आधारित वीज प्रकल्पांमुळे निर्माण होणारे प्रदूषण, कार्बन उत्सर्जन आणि पर्यावरणीय हानी यापासून जलविद्युत प्रकल्प तुलनेने सुरक्षित मानले जातात. आज जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदलाच्या संकटाच्या पार्श्वभूमीवर हरित ऊर्जेचे महत्त्व वाढत असताना कोयना प्रकल्पाचे योगदान अधिकच महत्त्वाचे ठरते.

कोयना धरणाने केवळ वीजच दिली नाही, तर सिंचनासाठीही मोठा आधार निर्माण केला. धरणातून सोडण्यात येणारे पाणी शेतीसाठी वापरले जाते. त्यामुळे सातारा आणि आसपासच्या भागातील कृषी विकासालाही या प्रकल्पामुळे चालना मिळाली. ग्रामीण भागातील आर्थिक बदलामागेही कोयना प्रकल्पाचा मोठा वाटा आहे. १९६७ साली कोयना परिसरात झालेला विनाशकारी भूकंप हा या प्रकल्पाच्या इतिहासातील मोठा टप्पा होता. या भूकंपात मोठे नुकसान झाले, अनेकांचे जीव गेले; परंतु इतक्या भीषण धक्क्यानंतरही कोयना धरण भक्कमपणे उभे राहिले. त्यानंतर लाखो लहान-मोठे भूकंपाचे धक्के बसूनही धरणाची सुरक्षितता टिकून आहे. त्यामुळे कोयना प्रकल्प हा केवळ अभियांत्रिकी नव्हे, तर सुरक्षिततेच्या दृष्टीनेही आदर्श मानला जातो.

आजच्या डिजिटल आणि औद्योगिक युगात वीज ही विकासाची मुख्य गरज बनली आहे. उद्योग, शेती, शिक्षण, आरोग्य, माहिती तंत्रज्ञान आणि दैनंदिन जीवन यांचे संपूर्ण चक्र विजेवर अवलंबून आहे. त्यामुळे सातत्यपूर्ण आणि स्वस्त वीजपुरवठा करणाऱ्या प्रकल्पांचे महत्त्व अधिक वाढले आहे. कोयना प्रकल्पाने गेली सहा दशके महाराष्ट्राच्या ऊर्जा गरजा पूर्ण करत राज्याच्या आर्थिक विकासाला गती दिली आहे.

भविष्यात अक्षय ऊर्जा क्षेत्राचा विस्तार होत असताना जलविद्युत प्रकल्पांचे महत्त्व कायम राहणार आहे. सौर आणि पवन ऊर्जा उत्पादनात सातत्य नसते; मात्र जलविद्युत प्रकल्प आवश्यकतेनुसार तत्काळ वीज निर्मिती करू शकतात. त्यामुळे ऊर्जा संतुलन राखण्यासाठी कोयना सारखे प्रकल्प भविष्यातही अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत. कोयना जलविद्युत प्रकल्पाची ६४ वर्षांची वाटचाल ही महाराष्ट्राच्या विकासगाथेतील अभिमानाची कहाणी आहे. सह्याद्रीच्या कुशीत उभा असलेला हा प्रकल्प केवळ वीजनिर्मिती करत नाही, तर महाराष्ट्राच्या प्रगतीचा प्रकाश सतत तेजस्वी ठेवत आहे. भारतीय अभियंत्यांच्या दूरदृष्टीचा, मेहनतीचा आणि तांत्रिक क्षमतेचा हा अजरामर वारसा पुढील अनेक दशकांपर्यंत महाराष्ट्राला ऊर्जा देत राहील, यात शंका नाही.

# राजारामबापूंच्या कार्याच्या सखोल अभ्यासासाठी विद्यापीठात संशोधन अध्यासन व्हायला हवे

## माजी कुलगुरू डॉ.माणिकराव साळुंखे

**ईश्वरपूर / प्रतिनिधी:–**

लोकनेते राजारामबापू पाटील यांचे महाराष्ट्र राज्याच्या जडणघडणीत मोलाचे योगदान आहे. त्यांनी शासन आणि सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण भागातील माणूस उभा केला आहे. नव्या पिढीला बापू आणि त्यांच्या कार्याची ओळख होण्यासाठी बापूंचे व्यक्तिमत्व आणि त्यांच्या कार्याचा सखोल अभ्यास व्हायला हवा,वेग - वेगळ्या विद्यापीठात संशोधन अध्यासन व्हायला हवे,अशी भावना सेंट्रल युनिव्हर्सिटी ऑफ राजस्थानचे माजी कुलगुरू डॉ.माणिकराव साळुंखे यांनी व्यक्त केली.

बेळगाव येथील श्री. तुकाराम महाराज सांस्कृतिक भवनमध्ये लोकनेते राजारामबापू पाटील राष्ट्रीय ललित कला सन्मान पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. राजारामबापू पाटील ललित कला अकादमी (महाराष्ट्र राज्य) आणि शब्दगंध कवी मंडळ संघ बेळगांव यांच्या संयुक्त विद्यमाने समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. माजी मंत्री आ. जयंतराव पाटील अध्यक्षस्थानी होते. जेष्ठ विचारवंत डॉ.अशोक चौसाळकर, माजी आ.मनोहर किणेकर, माजी आ.दिगंबर पाटील, मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समितीचे अध्यक्ष प्रकाश मरगाळे, दक्षिण महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष राजाभाऊ पाटील, माजी महापौर मालोजी अष्टेकर, प्राचार्य आर. डी. सावंत, अकादमीचे निमंत्रक प्रा. प्रदीप पाटील, शब्दगंधचे अध्यक्ष प्रा.अशोक आलगोंडी प्रामुख्याने उपस्थित होते. प्रारंभी लोकनेते राजारामबापू पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीप प्रज्वलन करण्यात आले.

डॉ.साळुंखे पुढे म्हणाले,बापूंचे कार्य महान आहे. मात्र त्यांच्याबद्दल जेवढे लेखन व्हायला हवे होते,तेवढे झालेले नाही. भविष्यात त्यांच्याबद्दल संशोधन आणि लेखन होण्यासाठी विद्यापीठात अध्यासन व्हावा, अशी माझी इच्छा आहे. मला बापूंचे आशिर्वाद आणि सहवास लाभला आहे, हे मी माझे भाग्य समजतो

डॉ. सुनिलकुमार लवटे म्हणाले, बेळगांवच्या साहित्य संमेलनात संयुक्त महाराष्ट्राची ज्योत पेटवली गेली. त्यानंतर महाराष्ट्र साकार झाला. बेळगांव हे महाराष्ट्राचे धडधडते हृदय आहे.

डॉ. अशोक चौसाळकर म्हणाले, स्व.यशवंत राव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या कृषी औद्योगिक विकासाचे



जे मॉडेल राज्याला दिले, त्याची अंमल बजावणी करण्यात बापूंची भूमिका मोलाची आहे.

आ. पाटील म्हणाले, बेळगांवशी अनेक वर्षाचे ऋणानुबंध आहेत. आपल्याकडे एक कार्यक्रम व्हावा,ही आमची इच्छा होती,त्याप्रमाणे हा कार्यक्रम होतो आहे. आम्ही बेळगांव हे आमचेच समजतो. आम्ही जेष्ठ साहित्यिक सदानंद मोरे यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीकडून पुरस्कर्त्यांची निवड करून मराठी माणूस रहात असलेल्या बडोदा,गोवा येथे वितरण कार्यक्रम घेतले आहेत. साहित्यातील विचारांच्या सामर्थ्याने समाजात मूलभूत परिवर्तन घडून येते. यावेळी सिसिलिया कार्व्हालो (वसई), शब्दगंधचे अध्यक्ष प्रा.अशोक आलगोंडी यांनीही मनोगत व्यक्त केले.

प्रारंभी अकादमीचे निमंत्रक प्रा. प्रदीप पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्राचार्य आर. डी. सावंत यांनी आभार मानले. अस्मिता देशपांडे (बेळगांव) यांनी सूत्रसंचालन केले.

याप्रसंगी मंगलताई गोगटे, डॉ.आनंद मेणसे, शोभा नाईक, उर्मिला शहा, डॉ.हेमंत अय्या (गोवा ), डॉ. पूर्वा वास्तू गोवा, प्रकाश जडे मंगळवेढा, डॉ. तुकाराम रोंगटे पुणे, अमृत तेलंग, लक्ष्मण मलागलेवार नांदेड, वसंत पाटील, मनिषा पाटील सांगली, उरुण ईश्वरपूरचे नगराध्यक्ष आंनदराव मलगुंडे, देवराज पाटील, विजयराव यादव, माणिकराव पाटील, बाळासाहेब पाटील, अतुल पाटील, शहाजी पाटील, प्रा.कृष्णा मंडले, सतिश पाटील यांच्यासह बेळगांव येथील लेखक-कवी, रसिक तसेच महाराष्ट्रातून आलेले साहित्यिक, व मान्यवर उपस्थित होते.

### पुरस्कारांचे वितरण

जेष्ठ साहित्यिक डॉ.सुनिलकुमार लवटे कोल्हापूर यांना रुपये १ लाख व सन्मान चिन्ह देवून जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच सिसिलिया कार्व्हालो (वसई), डॉ. विवेकानंद गोपाल (तंजावर, तामिळनाडू ) डॉ.सुरेंद्र दरेकर (अहिल्यानगर), शिवाजी विद्यापीठचे डॉ.रणधीर शिंदे यांना प्रत्येकी रुपये २५ हजार आणि सन्मान चिन्ह देवून कला सन्मान पुरस्काराने, तर श्री. अनंत कदम (होळसमुद्र कर्नाटक) यांना रुपये १५ हजार आणि सन्मान चिन्ह देवून विशेष सन्मान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुरस्काराचे हे चौथे वर्ष असून यापूर्वी पुणे, बडोदा आणि गोवा येथे पुरस्कार वितरण समारंभ पार पडले आहेत.

# सोलापुरात विडी घरकुल मध्ये फिल्मी स्टाईल चोरी

## दोरखंड बांधून M¸$ ATM$^2$ मशिनच पळवले

**सोलापूर/महेश गायकवाड :–**

सोलापुरात एमआय डी सी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विडी घरकुल या'' ठिकाणी फिल्मी स्टाईल चोरी केली गेली. चोरट्यांनी चक्क एटीएम मशीन च चोरून नेले आहे, दोरखंड बांधून M¸$ -TM$^2$ मशिनच चोरट्यांनी ओढत घेऊन गेले.,

सोलापूर शहरातील विडी घरकुल परिसरातून चोरट्यांनी थेट एटीएम मशीनच चोरी करून नेल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. सग्गम नगर भागात मध्यरात्रीच्या सुमारास घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

सोलापूर शहरातील विडी घरकुल परिसरातून चोरट्यांनी थेट एटीएम मशीनच चोरी करून नेल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. सग्गम नगर भागात मध्यरात्रीच्या सुमारास घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. चोरट्यांच्या या कार नाम्यामुळे



नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार,चोरट्यांनी चारचाकी वाहनाच्या मदतीने एटीएम मशीनला दोरखंड बांधून ते बाहेर ओढले आणि मशीनसह पसार झाले. संपूर्ण प्रकार अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

गेल्या काही दिवसांपासून चोरीच्या घटनांमध्ये वाढ

घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी (MIDC) पोलीस स्टेशनचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी एटीएम सेंटरमधील दोन अंतर्गत आणि बाहेरील एक अशा तीन सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज ताब्यात घेतलं आहे. त्याआधारे आरोपींचा शोध सुरू करण्यात आला आहे. दरम्यान, चोरीला गेलेल्या एटीएम मशीनमध्ये किती रक्कम होती, याबाबत अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही.

शहरातील नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण

बँकेच्या अधिकाऱ्यांनीही घटनास्थळी भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला.सोलापूर शहरात गेल्या काही दिवसांपासून चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे चित्र आहे. आता थेट बँकेच्या एटीएमवरच चोरट्यांनी डल्ला मारल्याने नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना अधिक तीव्र झाली आहे. आरोपींना तातडीने अटक करून कठोर कारवाई करावी,अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

### सोलापूर ची पोलिस यंत्रणा कुचकामी पोलीस आयुक्त यांना निलंबित करण्यात यावे

सोलापूर शहर पोलीस आयुक्तालय हद्दीत दररोज खून हाणामाऱ्या चोऱ्या होत असून सोलापूर मध्ये मोठ्या प्रमाणात अवैध धंदे वाढले आहेत ड्रग ची तस्करी होत आहे गुटखा बेफाम विकला जात आहे मटका जोरात सुरू आहे याकडे अवैध वाहतूक मोठ्या प्रमाणावर सुरू आहे यासर्व बाबींकडे पोलिस आयुक्तांचे सोयीस्कर डोळे झाक झाली आहे. यहा के हम है राजकुमार यहा किसी का चलता नही सिर्फ हमारा चलेगा असे पोलीस आयुक्त यांनी पदाची सूत्रे हाती घेतले तेव्हा गर्जना केली होती या सर्व गरजेचे काय झाले वाघाची शेळी झाली आहे काय असा सवाल उपस्थित होत आहे. चक्क रस्त्यावर हातभटी दारू विक्री केली जात आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यान परिसरात अवैध धंदे हातभट्टी दारू मोठ्या प्रमाणात सुरू आहे याकडे ही पोलीस आयुक्तांनी पद्धतशीर दुर्लक्ष केले आहे

### महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,अक्कलकोटच्या वतीने तहसीलदारांना दिले निवेदन

# संजयजी भोकरे यांना झेड प्लस सुरक्षा द्यावी

## अध्यक्ष कमलाकर सोनकांबळे सरकारकडे मागणी

**अक्कलकोट/प्रतिनिधी:–**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे व सांगली येथील अंबाबाई तालीम संस्थेचे अध्यक्ष संजयजी भोकरे यांच्या हत्येचा कट पोलिसांनी उधळून लावल्याने राज्यात खळबळ माजली आहे.या घटनेचे गांभीर्य लक्षात घेता, राज्य शासनाने त्यांना तातडीने 'झेड प्लस' (न+) दर्जाचे पोलीस संरक्षण पुरवावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ अक्कलकोटच्या वतीने राज्याच्या गृहमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

सांगली पोलिसांनी नुकतीच धडाकेबाज कारवाई करत संजयजी भोकरे यांच्या हत्येचा मोठा कट उधळून लावला आहे.या प्रकरणात पोलिसांनी तीन संशयित आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून दोन देशी बनावटीची पिस्तूलं चार जिवंत काडतूसं धारदार शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत.

भोकरे यांना 'प्लॅन बी' नुसार पुन्हा हल्ला होण्याची दाट शक्यता आहे. तरी राज्य शासनाने त्यांना तातडीने 'झेड प्लस' (न+) दर्जाचे पोलीस संरक्षण पुरवावे या मागणीचे निवेदन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अध्यक्ष कमलाकर सोनकांबळे यांच्या अध्यक्षतेखाली तहसीलदार विनायक मगर यांच्याकडे देण्यात आली.यावेळी सचिव विश्वनाथ चव्हाण, वरिष्ठ पत्रकार आणि सुयश मीडिया ग्रुप चे ब्युरो चिफ महेश गायकवाड पत्रकार बसवराज बिराजदार, चेतन जाधव, समाधान अहिरे, गौतम बाळशंकर, रेवणसिद्ध पुजारी, गणेश भालेराव, निंगाप्पा निंबाळ यांच्यासह अनेक पत्रकार बांधव उपस्थित होते.



संजय भोकरे यांच्यासारख्या ज्येष्ठ पत्रकाराला जीवे मारण्याचा कट रचला जाणे, ही लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर झालेली मोठी टांगती तलवार आहे. पोलिसांनी हा कट उधळून लावून मोठे अनर्थ टाळले असले, तरी ही घटना पत्रकारितेसाठी अत्यंत धक्कादायक आणि चिंताजनक आहे.राज्यात 'पत्रकार संरक्षण कायदा' अस्तित्वात असूनही अशा घटना घडणे दुर्दैवी आहे.या कायद्याची अधिक कडक अंमलबजावणी करून पत्रकारांना सुरक्षित वातावरण निर्माण करून देणे ही सरकारची जबाबदारी आहे. लेखणीवर होणारा हल्ला हा विचारांवर होणारा हल्ला आहे. शासनाने वेळीच पावले उचलून गुन्हेगारांमध्ये कायद्याचा धाक निर्माण करावा.

–विश्वनाथ चव्हाण
सचिव,महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ अक्कलकोट

संजयजी भोकरे यांच्या जीविताला असलेला धोका पाहता त्यांना तात्काळ 'झेड प्लस' सुरक्षा प्रदान करावी.सिद्धार्थ भोकरे यांना मिळालेली धमकी आणि सध्याचा कट यांचा परस्परांशी संबंध आहे का, याची सखोल चौकशी व्हावी.या कटामागील मुख्य 'बोलवता धनी' कोण आहे, याचा शोध घेऊन त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करावी.राज्याच्या गृहमंत्र्यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन पत्रकारितेतील एका ज्येष्ठ व्यक्तीला आणि त्यांच्या कुटुंबाला कडेकोट सुरक्षा पुरवावी

कमलाकर सोनकांबळे
अध्यक्ष –महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ अक्कलकोट

# भाजी मंडईत आरडाओरडा ; दारूबंदी कायद्यान्वये एकावर गुन्हा

**सातारा/प्रतिनिधी:–**

सातारा शहरातील जुना मोटर स्टँड परिसरातील भाजी मंडईत मोठमोठ्याने आरडाओरडा करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई शाहूपुरी पोलीस ठाणे हद्दीत करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. १५ रोजी सायंकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास अनिल कोळी हा इसम भाजी मंडई परिसरात आरडाओरडा करीत असताना आढळून आला. त्याच्या वर्तनावरून तो मद्यप्राशन केलेल्या अवस्थेत असल्याचा संशय आल्याने त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ८५(१) अन्वये सरकारतर्फे फिर्याद दाखल करण्यात आली.

# गांधी चौकात महिलेच्या गळ्यातील सोनसाखळी चोरट्यांनी केली पसार

**विटा / प्रतिनिधी:–**

विटा शहरातील विटा पोलीस ठाणे हद्दीत सोनसाखळी चोरट्यांनी धुमाकूळ घातला आहे. मागील काही महिन्यापूर्वी विटा शहरात मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातून सुद्धा पहाटेच्या वेळी काही सोनसाखळी चोरट्यांनी महिलेच्या गळ्यातील सोन्याचे दागिने हिसडा मारून पळून गेले होते. त्यानंतर नेहमी गजबजलेला चौक विटा शहरातील गांधी चौक, बाबर गल्ली या नावाने ओळखला जातो. या चौकात एक महिला एका ठिकाणी कार्यक्रमानिमित्त घरातील नातेवाईक व काही महिला यांच्याबरोबर गेल्या होत्या कार्यक्रम संपल्यानंतर घरी परत जात असताना जवळच्या आजूबाजूच्या सर्व महिला आपापल्या घरी परत गेल्या. यावेळी बाबर गल्ली रस्त्याच्या कडेला सदर एक महिला उभा राहिली होती. यावेळी दोन ते तीन अनोळखी इसम इकडे तिकडे फिरत होते. काही क्षणात त्या परिसरात अंधार लक्षात घेता सोनसाखळी चोरट्यांनी विलंब न लावता उभी असलेल्या महिलेच्या गळ्यातील सोन्याचे



मनी मंगळसूत्र हिसडा मारून घटनास्थळावरून पसार झाले.

सोनसखाली चोरांनी दागिने पळवल्यावर त्या महिलेने आरडाओरडा केला. काही क्षणात चोरट्यांच्या हाती या मंगळसूत्रातील अर्धा भाग त्यांच्या हाती व अर्धा भाग त्या महिलेच्या हातात तुटून राहिला. आरडाओरडा केल्याने आजूबाजूचे लोक जमा झाल्याने चोरट्याने घटनास्थळावरून धूम ठोकली. सदर आजूबाजूच्या काही नागरिकांनी व मित्र परिवारांनी दुचाकीवरून या चोरट्यांचा शोध सर्वत्र घेतला; परंतु ते मिळून आले नाहीत.

घटनेची माहिती मिळताच विटा पोलिसांनी रात्री घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर सर्वत्र हे चोरटे सीसीटीव्ही कॅमेरामध्ये कैद झाले आहेत का, याचा तपास करत विटा पोलीस सीसीटीव्ही कॅमेरा फुटेज मिळवण्याच्या प्रयत्नात होते. काही महिलांनी व नागरिकांनी त्यांच्या वर्णन संदर्भात विटा पोलिसांना माहिती दिली.

विटा पोलिसांनी या सोनसाखळी चोरट्यांच्या गेलेल्या मार्गावर व आजूबाजूला तातडीने तपास करत त्यांचा शोध घेत आजूबाजूला या संदर्भात विटा पोलिसांनी माहिती घेतली. रस्त्याकडेला उभ्या असणाऱ्या महिलेच्या गळ्यातील सोन्याचे दागिने चोरट्यांनी हिसडा मारल्याने त्या परिसरात नागरिकांतून भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सदर विटा पोलिसांच्या हाती काही धागेदोरे या चोरट्यांचे लागले असल्याची माहिती ही मिळाली आहे.

# फडतरवाडीची (बुध) 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज' मूल्यमापन तपासणी

**पुसेगाव/प्रतिनिधी : –**

फडतरवाडी (बुध), ता. खटाव ग्रामपंचायतीमध्ये 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' अंतर्गत मूल्यमापन समितीची तपासणी पार पडली. गावातील एकता, रांगोळ्या, रंगरंगोटी आणि बळीराजाच्या रथातून करण्यात आलेल्या समितीच्या स्वागताने प्रशासकीय अधिकारीही भारावून गेले.

मूल्यमापन समितीचे अध्यक्ष डॉ. सुधीर धनगे (तालुका आरोग्य अधिकारी, मालवण), सचिव लक्ष्मण हांडे (विस्ताराधिकारी, मालवण), आणि गितेश कोंदे (घरकुल विभाग, मालवण) यांच्यासह पंचायत समिती वडूजच्या कर्मचाऱ्यांचे गावात आगमन होताच ग्रामस्थांनी त्यांचे स्वागत केले. फुलांनी सजवलेला बळीराजाचा रथ आणि ठिकठिकाणी काढलेल्या आकर्षक रांगोळ्यांमुळे संपूर्ण गावाला उत्सवाचे स्वरूप आले होते.

समितीने गावातील विविध विभागांची आणि पायाभूत सुविधांची बारकाईने पाहणी केली. जिल्हा परिषद शाळा, अंगणवाडी आणि तेथील नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम, स्मशानभूमीतील सुविधा, घरकुल योजना आणि स्वच्छतेचे निकष, महिला



बचत गट, शेतकरी गट आणि सहकारी सोसायटीचे कामकाज, ग्रामस्थांची लोकवर्गणी आणि सामाजिक उत्तरदायित्व निधीतून (उडठ) झालेली शाळेची रंगरंगोटी, ओपन जिम आणि बंदिस्त व्यायामशाळा, जांभळाचे गाव' म्हणून नवी ओळख आदी गोष्टींच पाहणी करण्यात आली.

या दौऱ्यातील मुख्य आकर्षण ठरले गावाची वृक्षलागवड मोहीम. गावाच्या एकूण लोकसंख्येइतकी झाडे लावून त्यांचे संगोपन केले जात आहे. विशेष म्हणजे, प्रत्येक झाडाला गावातील महिलांच्या नावाचे टॅग लावण्यात आले असून, त्यांच्यावरच संगोपनाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. जांभळाच्या झाडांची मोठ्या प्रमाणावर लागवड करून, भविष्यात 'जांभळाचे गाव'म्हणून ओळख निर्माण करण्याचा संकल्प ग्रामपंचायतीने केला आहे.

ही तपासणी यशस्वी करण्यासाठी सरपंच प्रियांका फडतरे, उपसरपंच सयाजी फाळके ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक, तरुण मंडळ आणि विशेषतः महिला वर्गाने अहोरात्र परिश्रम घेतले. शंभर गुणांच्या निकषांवर उतरण्यासाठी गावाने दाखवलेली ही सज्जता इतर ग्रामपंचायतींसाठी आदर्शवत ठरणारी आहे.

गावातील प्रत्येक नागरिकाने या अभियानाला आपली वैयक्तिक जबाबदारी समजून काम केले आहे. लोकसहभाग आणि प्रशासकीय पारदर्शकता यामुळेच फडतरवाडी (बुध) आज समृद्धीच्या वाटेवर आहे.

– सयाजी फाळके (उपसरपंच, फडतरवाडी)



# महाराष्ट्रात सोलापूर नंबर १

## साखर,केळी,डाळिंब,द्राक्ष अन टेक्सटाईल व वाहन विक्री उद्योगात निर्माण केला जागतिक दबदबा

पुरवणी संकलन
महेश गायकवाड
सोलापूर जिल्हा प्रतिनिधी

**सोलापूर/महेश गायकवाड : –** महाराष्ट्रात सध्या आर्थिक व्यवसायात सोलापूर नंबर १ ठरले आहे. साखर उत्पादन, केळी शेती, डाळिंब शेती, द्राक्ष उत्पादन अन टेक्सटाइल उद्योगांसोबतच वाहन विक्री उद्योगात सोलापूर जिल्ह्याने जागतिक स्तरावर आपला मोठा दबदबा निर्माण केला आहे.

सोलापूर जिल्ह्याने दुष्काळी परिस्थिती मधून आणि कोरडवाहू शेतीतून समृद्धीकडे झेप घेतली आहे हेच आपल्या जिल्ह्यातील भाजीपाला फळे आणि कच्चा माल परदेशात जातोय यावरून दिसून येते, 'दुष्काळी' अशी ओळख असलेल्या सोलापूर जिल्ह्याने फळबागा, प्रक्रिया उद्योग आणि निर्यातीच्या बळावर समृद्धीकडे दमदार वाटचाल सुरू केली आहे. साखर, केळी, डाळिंब, द्राक्ष या पिकांच्या माध्यमातून सोलापूरने देशासह जागतिक पातळीवर वर्चस्व निर्माण केले आहे.

सोलापूर जिल्हा 'दुष्काळी' जिल्हा अशी ओळख असलेल्या सोलापूर जिल्ह्याने फळबागा, प्रक्रिया उद्योग आणि निर्यातीच्या बळावर समृद्धीकडे दमदार वाटचाल सुरू केली आहे. साखर, केळी, डाळिंब, द्राक्ष या पिकांच्या माध्यमातून सोलापूरने देशासह जागतिक पातळीवर वर्चस्व निर्माण केले आहे. सध्या जिल्ह्यात सुमारे १ लाख ३५ हजार हेक्टरवर फळबागा तर २ लाख हेक्टरवर उसाचे क्षेत्र असून, या माध्यमातून दरवर्षी हजारो कोटींची उलाढाल होत आहे. तसेच सोलापूरच्या टेक्सटाइल उद्योगानेही जागतिक पातळीवर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. जिल्ह्यातील निर्यातीमध्ये कृषी उत्पादनांच्या खालोखाल टेक्सटाइलचा वाटा आहे. एकूण निर्यातीपैकी १६ टक्के निर्यात ही टेक्सटाइल उत्पादनांची आहे. महाराष्ट्र दिनाच्या पार्श्वभूमीवर सोलापूरच्या या प्रगतीचा घेतलेला आढावा.

### बेदाण्यामुळे द्राक्षबागांना नवे बळ

द्राक्ष व बेदाणा उत्पादनातही सोलापूरने वेगळी ओळख निर्माण केली आहे. द्राक्षांची गोडी आणि दर्जेदार बेदाण्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मोठी मागणी आहे. एकेकाळी बेदाणा बाजारपेठेत सांगली-तासगावचे वर्चस्व असताना आता सोलापूर आणि पंढरपूर बाजार समित्या प्रमुख केंद्र म्हणून पुढे आल्या आहेत. पूर्वी केवळ ताज्या द्राक्ष विक्रीवर भर असताना आता बेदाणा निर्मितीमुळे द्राक्षशेतीला नवे बळ मिळाले आहे. जिल्ह्यात द्राक्ष लागवड सुमारे २५ हजार हेक्टरपर्यंत पोहोचली असून द्राक्ष विक्री आणि बेदाणा उत्पादनातून दरवर्षी सुमारे ५ हजार कोटींची उलाढाल होते.

### डाळिंबाने घडवून आणली कृषीक्रांती आणि केली 'गोड' कमाई

डाळिंबाने जिल्ह्यात कृषी क्रांती घडवून आणली आहे. जिल्ह्यात सुमारे ३७ हजार हेक्टरवर डाळिंबाची लागवड असून गुणवत्तापूर्ण उत्पादनामुळे सोलापूरने जागतिक बाजारपेठेत ठसा उमटवला आहे. आकर्षक रंग, चांगला आकार आणि उत्कृष्ट चवीमुळे येथील डाळिंबाला युरोप तसेच आखाती देशांत मोठी मागणी आहे. देशांतर्गत विक्रीबरोबरच निर्यातीमुळे शेतकऱ्यांना चांगला दर मिळत असून, यामधून दरवर्षी सुमारे ३ हजार कोटींची उलाढाल होते.

### केळी उत्पादनात राज्यात आघाडी

केळी उत्पादनात सोलापूरने मक्तेदारी मोडीत काढत राज्यात अव्वल स्थान मिळवले आहे. विशेष म्हणजे, जिल्हा केवळ उत्पादनापुरता मर्यादित न राहता केळी निर्यातीचे 'ग्लोबल हब' म्हणून उदयास आला आहे. ठिबक सिंचन, टिश्यू कल्चर रोपे आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानामुळे उत्पादनक्षमता वाढली असून अनेक शेतकरी प्रतिहेक्टर ३० ते ३५ टनांपर्यंत उत्पादन घेत आहेत. सध्या सुमारे ३६ हजार हेक्टरवर केळीची लागवड असून जिल्हा निर्यात क्षेत्रातही पुढे आला आहे. अनेक शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या (एफपीओ) माध्यमातून थेट निर्यातदार म्हणून पुढे येत आहेत. कोल्ड स्टोरेज, पॅकिंग हाऊस आणि लॉजिस्टिक्स सुविधांमुळे केळी निर्यातीला चालना मिळत आहे. राज्याच्या एकूण केळी निर्यातीत सुमारे ६५ टक्के वाटा सोलापूरचा असून या पिकातून दरवर्षी ८०० ते १,००० कोटींची उलाढाल होते.

### सोलापूरच्या टेक्सटाइलची ओळख जागतिक पातळीवर

मागील काही वर्षांत सोलापूरच्या वस्त्रोद्योग निर्यातीमध्ये सकारात्मक बदल झाले आहेत. देशांतर्गत बाजारपेठेत येथील फॅन्सी व युनिफॉर्म उत्पादने वेगळी ओळख निर्माण करत आहेत. युनिफॉर्म व गारमेंट प्रकारच्या उत्पादनांची निर्यात चांगल्या प्रमाणात होत आहे. कृषी उत्पादनांच्या खालोखाल टेक्सटाइल निर्यातीचा वाटा आहे. एकूण निर्यातीपैकी १६ टक्के निर्यात ही टेक्सटाइल उत्पादनांची आहे. सोलापूरचे युनिफॉर्म सध्या यूएई, दुबई, युगांडा, कतार, इस्रायल, केनिया, बहारिन, सौदी, युके, टांझानिया, यूएसए व घाना या देशांत निर्यात होतात. टेरी टॉवेलची उत्पादने युरोप आणि यूएसएमध्ये पूर्वीपासून मागणीत आहेत. युनिफॉर्मच्या संदर्भात केवळ शालेय गणवेश एवढ्यापुरता उद्देश न ठेवता कॉर्पोरेट ते आर्मी गणवेशापर्यंत सर्व प्रकारची उत्पादने तयार करण्याची तयारी सोलापूरच्या वस्त्रोद्योग क्षेत्राने केली.

### सोलापूरचा आर्थिक कणा... साखर उद्योग

सोलापूर जिल्ह्यातील साखर उद्योग हा स्थानिक अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. राज्यातील सर्वात मोठ्या साखर कारखानदारी म्हणून सोलापूरची ओळख आहे. वाढत्या सिंचनामुळे ऊस लागवड वाढली असून जिल्ह्यात सुमारे ४३ हून अधिक साखर कारखाने कार्यरत आहेत. जिल्ह्याची एकूण गाळप क्षमता अंदाजे २ लाख टन प्रतिदिन आहे. साखर उत्पादनासोबतच बगॅसवर आधारित वीजनिर्मिती आणि मोलॅसेसपासून इथेनॉल निर्मितीमुळे उद्योग अधिक सक्षम झाला आहे. या क्षेत्रातून थेट व अप्रत्यक्ष मिळून सुमारे १ ते १.५ लाख लोकांना रोजगार मिळत आहे. हा उद्योग शेतकरी, वाहतूक, कामगार आणि ऊर्जा क्षेत्राशी जोडलेला आहे. दरातील चढ-उतार आणि पाण्याच्या समस्यांसारखी आव्हाने असली तरी जिल्ह्यातील साखर उद्योगाची एकूण उलाढाल सुमारे १० हजार कोटींच्या घरात असून, हा उद्योग जिल्ह्याच्या विकासाचा प्रमुख आधार आहे.











